दैनिक
लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंतिम मुदत १० ऑगस्टपर्यंत; एल निनोच्या पार्श्वभूमीवर कृषिमंत्री भरणे यांचे महत्त्वाचे आवाहन

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- राज्यातील शेतकऱ्यांनी ६१ लाख ८२ हजार २१८ शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी नोंदणी केली आहे. अद्याप काही शेतकरी तांत्रिक अडचणी, कागदपत्रांची पूर्तता अथवा इतर वैयक्तिक कारणांमुळे अर्ज दाखल करू शकलेले नाहीत. या बाबींचा विचार करून प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ वरून १० ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. राज्यातील आठ कृषी विभागांच्या आकडेवारीनुसार कोकण विभागातून १,०२,३३५, नाशिक विभागातून ३,३३,३८५, पुणे विभागातून ६,०७,६६३, कोल्हापूर विभागातून २,४०,२५३, छत्रपती संभाजीनगर विभागातून १३,२५,०००, लातूर विभागातून २,४२,८२६, अमरावती विभागातून ६,९१,९७३ आणि नागपूर विभागातून ४,५३,३८३ शेतकऱ्यांनी पीक विम्यासाठी नोंदणी केली आहे. एकूण ६१ लाख ८२ हजार २१८ शेतकरी या योजनेत सहभागी झाले असून, मराठवाडा विभागातून सर्वाधिक तर कोकण विभागातून सर्वात कमी प्रतिसाद मिळाल्याचे या आकडेवारी दिसून येते. पीक कर्जदार शेतकऱ्यांनी संबंधित बँकेशी संपर्क साधून, तर बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी अधिकृत पोर्टल किंवा जवळच्या सेवा केंद्रामार्फत १० ऑगस्ट २०२६ पूर्वी अर्जाची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

(वर्ष ६५ वे अंक १९६) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.०२ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

अँटिलिया स्फोटक आणि मनसुख हिरेन हत्या प्रकरण

सचिन वाझे, प्रदीप शर्मासह १० आरोपींवर अखेर आरोप निश्चित

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाबाहेर स्फोटकांनी भरलेली गाडी सापडल्याच्या आणि उद्योगपती मनसुख हिरेन यांच्या हत्येच्या बहुचर्चित प्रकरणात मुंबईतील विशेष एनआयए न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे आणि माजी एन्काउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा यांच्यासह एकूण १० आरोपींविरोधात अखेर ५ वर्षांनंतर आरोप निश्चित करण्यात आले आहेत.

आरोप निश्चिती झाल्यामुळे या हायप्रोफाइल प्रकरणाच्या प्रत्यक्ष सुनावणीचा आणि खटल्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. सर्व आरोपींविरुद्ध बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायदा आणि भारतीय दंड संहितेच्या विविध गंभीर कलमांखाली खटला चालवला जाणार आहे.

२५ फेब्रुवारी २०२१ रोजी दक्षिण मुंबईतील मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया या निवासस्थानाबाहेर बेवारस सोडलेली एक संशयित स्कॉर्पिओ गाडी आढळून आली होती. या गाडीत जिलेटिनच्या २० कांड्या आणि धमकीचे पत्र सापडले होते, ज्यामुळे संपूर्ण देशात खळबळ उडाली होती.

त्यानंतर अवघ्या काही दिवसांत, म्हणजेच ५ मार्च २०२१ रोजी या गाडीचे मालक मनसुख हिरेन यांचा मृतदेह मुंब्रा येथील खाडीत रहस्यमय परिस्थितीत आढळून आला. मनसुख हिरेन यांची हत्या सचिन वाझे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीच केल्याचा गंभीर आरोप हिरेन यांच्या कुटुंबीयांनी केला होता.

सुरुवातीला या प्रकरणाचा तपास महाराष्ट्र एटीएसकडे होता, मात्र घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्रीय गृह मंत्रालयाने हा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे सोपवला. गेल्या पाच वर्षांपासून या प्रकरणात डिस्चार्ज अर्ज आणि विविध याचिकांमुळे आरोप निश्चितीची प्रक्रिया प्रलंबित होती. मात्र, आता एनआयए न्यायालयाने आरोपींवर अधिकृतपणे आणि हत्येशी संबंधित कलमांखाली दोषारोप निश्चित केल्याने, साक्षीदारांची साक्ष नोंदवण्याची प्रक्रिया सुरू होऊन खटल्याची सुनावणी वेगाने पार पडणार आहे.

पुण्यात अमित शाहांच्या हस्ते डोवाल यांना लोकमान्य टिळक पुरस्कार प्रदान

पाचव्या वर्षी पुण्यातील शाळेत लोकमान्य टिळकांची महानता कळली, नी ७६ वर्षांनी पुण्यातच त्यांच्याच नावे पुरस्कार-अजित डोवाल

पुणे दि.१ (प्रतिनिधी)- राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना पुण्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या हस्ते यांना लोकमान्य टिळक पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कारासाठी डोवाल यांनी टिळक स्मारक ट्रस्टचे आभार मानले. डोवाल यांनी यावेळी बोलताना लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली अर्पण केली. स्वातंत्र्यलढ्यातील टिळकांच्या योगदानावर भाष्य करताना टिळकांचे बलिदान सर्वोच्च असल्याचे नमूद केले. डोवाल यांनी यावेळी त्यांचा पुण्याशी देखील संबंध असल्याचे सांगितले.

''पुण्याशी माझा देखील संबंध आहे. ७६ वर्षापूर्वी लष्करात असलेल्या वडिलांची पुण्यात बदली झाल्याने मीही पुण्यात आलो होता. सव्वा एक ते दीड वर्ष मी पुण्यात होता. येथे माझे शालेय शिक्षण देखील झाले आहे. प्रत्येक मंगळवारी माझी आई चतुःशृंगी मंदिरात घेऊन जायची, नैवेद्य ठेवायचो. शाळेत प्रार्थनेच्या वेळी शिक्षक मूल्यशिक्षणावर व्याख्यान द्यायचे. लोकमान्य टिळकांबाबत मी वयाच्या पाचव्या वर्षी पहिल्यांदा ऐकलं, त्यानंतर आता ७६ वर्षांनी पुण्यातच त्यांच्याच नावे पुरस्कार मिळतोय हे मी माझं सौभाग्य समजतो, मी कल्पना देखील करु शकत नाही'', असे अजित डोवाल म्हणाले.

''लोकमान्य टिळकांचे योगदान समजून घेण्यासाठी आपल्याला इतिहासात जावं लागेल, तो काय काळ होता हे समजून घ्यावं लागेल. आजकाल हक्कांबाबत बोलणाऱ्यांना हे समजून घ्यावं लागेल की या हक्कांचा गैरवापर केल्यास त्या लोकांच्या मनाला किती वाईट वाटेल याचा विचार करायला हवा.'' भारतेंदु हरिश्चंद्र यांच्या भारतदुर्दशा नाटकाचा संदर्भ यावेळी डोवाल यांनी दिला. ''या पुस्तकात हरिश्चंद्र यांनी भारताचे वर्णन केले आहे. अनेक अत्याचार, वाईट स्थिती या विरोधात आवाज उठविण्याचे कोणात धाडस नव्हते. देशात विविध भागात आंदोलन व्हायला लागली, आक्रोश दिसायला लागला महाराष्ट्रात याचे नेतृत्व लोकमान्य टिळकांनी केलं. स्वराज्य माझा जन्मसिद्ध अधिकार आहे, आणि मी तो मिळवणारच, ही केवळ घोषणा नव्हती तर देशातील नागरिकांमध्ये स्फुलिंग निर्माण करणारी उद्घोषणा होती'', असे डोवाल म्हणाले.

यावेळी अजित डोवाल यांनी देशाला प्रगत, विकसित करण्यासाठी आपण प्रयत्न करायला हवं, यासाठी एकजूट होऊन काम करण्याचा संकल्प करायला हवा, असे आवाहन केलं. एखादी गोष्ट स्वतःच्या स्वार्थासाठी असेल आणि देश हिताच्या नसेल तर ती टाळायला हवी, असेही डोवाल म्हणाले. डोवाल यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाहांचे कौतुक केले. देशाच्या नेतृत्वाकडे देशाला विकसित करण्याचा स्पष्ट दृष्टीकोन असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, नेतृत्व देशात विकसित होण्याच्या दिशेने घेऊन जाईल, असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी बोलताना अमित शहा म्हणाले, आज महान देशभक्त लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आहे. त्यांनी देशासाठी दिलेल्या योगदानाला स्मरण करतो. आज अण्णा भाऊ साठे यांची जयंती आहे. अण्णा भाऊ साठे यांना पाहून आपल्याला कळते की ते विद्यार्थी असताना फक्त दीड दिवस शाळेत गेले आणि तरी देखील ते लोकशाहीर झाले.

अमित शहा म्हणाले, लोकमान्य टिळक यांनी देशाला नवीन दिशा देण्यासाठी उद्घोषणा केली, स्वराज्य माझा जन्मसिद्ध अधिकार आहे. जेव्हा त्यांनी हे वाक्य बोलले असेल तो क्षण कसा असेल याचा केवळ मी विचार करू शकतो. टिळक महाराजांनी जनतेला जोडण्याचे काम केले, त्यांनी आंदोलनात एका नवीन प्रकारच्या राष्ट्रवादाला जन्म दिला, सांस्कृतिक राष्ट्रवाद. त्यांनी गणेशोत्सव आणि शिवाजी जयंती सुरू (पान ४ वर)

भोंदू अशोक खरात शिर्डी पोलिसांच्या ताब्यात

राहाता दि.१ (प्रतिनिधी)- समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या राहाता शहरातील शाखेत बोगस खाती उघडून आर्थिक व्यवहार केल्याप्रकरणी दाखल असलेल्या गुन्ह्यात आरोपी भोंदू अशोक खरात याला शिर्डी पोलिसांनी अटक केली. खरातला आज, शनिवारी न्यायालयाने ७ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावल्याची माहिती 'एसआयटी'चे तपास अधिकारी तथा शिर्डी उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांनी दिली.

अशोक खरात नाशिक कारागृहात न्यायालयीन कोठडीत होता. दिनेश परब यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार राहाता पोलीसांनी अशोक खरातविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केलेला आहे. समता पतसंस्थेच्या राहाता शाखेत १०० बनावट खात्यांच्या गाजलेल्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात मुख्य आरोपी अशोक खरात याला नाशिक 'एसआयटी'ने पुन्हा काल शुक्रवारी रात्री शिर्डी पोलिसांच्या स्वाधीन केले.

यापूर्वी शिर्डीतील जमीन खरेदी प्रकरणात झालेल्या चौकशीत अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या होत्या. राहाता येथील समता पतसंस्थेत ५७ व्यक्तींच्या नावावर १०० बनावट खाती उघडण्यात आली होती. विशेष म्हणजे या सर्व खात्यांमध्ये अशोक खरात याचेच नाव वारसदार म्हणून नोंदविण्यात आले होते. या खात्यांमधून कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल झाल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे. शिर्डी पोलिसांनी संबंधित खातेदारांची चौकशी केली असता, सर्वांनी आपण कोणतेही खाते उघडले नसल्याचे स्पष्ट सांगितले. त्यामुळे बनावट कागदपत्रांच्या आधारे ही खाती उघडल्याचा पोलीसांचा संशय अधिकच बळावला.

नेत्यांना हनी ट्रॅपमध्ये फसवण्याचा डाव उघड, जैश ए मोहम्मदच्या दहशतवाद्याची गर्लफ्रेंड अर्पिता सरकारला अटक

कोलकाता दि.१ (वृत्तसंस्था)- पश्चिम बंगालमधील राजकीय नेते आणि व्हीआयपी व्यक्तींना हनी ट्रॅपमध्ये फसवून त्यांची संवेदनशील गुप्त माहिती गोळा करण्याचा एक अत्यंत मोठा कट स्पेशल टास्क फोर्सने उधळून लावला आहे. जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेशी संबंधित संशयित ऑपरेटर मोहम्मद हामिम मंडल याच्या अटकेनंतर, आता त्याच्या जवळच्या सहकाऱ्याला आणि प्रेयसीला म्हणजेच अर्पिता सरकार हिला झारखंडच्या साहिबगंज येथून अटक करण्यात आली आहे.

अर्पिता सरकार हिला साहिबगंज येथून ताब्यात घेऊन बंगालमधील बर्धमान येथे आणण्यात आले आहे. या दोघांमध्ये व्हॉट्सॲपच्या माध्यमातून झालेला डिजिटल संवाद आणि चॅट एसटीएफने जप्त केले असून, त्यांच्या आंतरराष्ट्रीय कनेक्शनचा तपास सुरू आहे. दरम्यान, अर्पिता सरकार हिला १३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

विशेष पथकाने ३० जुलै रोजी बर्धमान शहरातील एका गृहनिर्माण संस्थेतील भाड्याच्या अपार्टमेंटमधून मोहम्मद हामिम मंडल याला बेड्या ठोकल्या होत्या. प्राथमिक तपासानुसार, मंडल हा आयएसआय समर्थित दहशतवादी नेटवर्कचा भाग असल्याचा संशय आहे. पश्चिम बंगालमध्ये भाजप नेत्यांसह इतर प्रमुख राजकीय व्यक्तींची वैयक्तिक माहिती गोळा करणे, नवीन ऑपरेटिव्हची भरती करणे आणि संभाव्य दहशतवादी कारवायांसाठी पाया तयार करणे, हे काम त्याच्यावर सोपवण्यात आले होते.

पीटीआय वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने अनेक राजकीय नेत्यांची संवेदनशील व खासगी माहिती मिळवण्यासाठी एक विस्तृत जाळे तयार केले होते. या नेटवर्कमध्ये अर्पिता सरकार हिचा वापर नेत्यांशी संपर्क साधण्यासाठी आणि त्यांच्याकडून महत्त्वाची माहिती मिळवण्यासाठी केला जात होता. जप्त केलेल्या डिजिटल पुराव्यांच्या आधारे पोलीस या हनी ट्रॅप नेटवर्कचा कसून तपास करत आहेत.

पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेंदु अधिकारी यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना हे अत्यंत गंभीर आणि संवेदनशील प्रकरण असल्याचे म्हटले आहे. ''वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि एसटीएफ या प्रकरणाचा तपास करत आहेत.

संशयिताचे आंतरराष्ट्रीय धागेदोरे असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सुरुवातीच्या तपासात हा आरोपी माझ्या हालचालींवर आणि ताफ्याच्या मार्गावर पाळत ठेवून असल्याचे समोर आले आहे,'' असे त्यांनी सांगितले.

हनी ट्रॅपच्या माध्यमातून जमा करण्यात आलेल्या गोपनीय माहितीचा वापर पुढे मोठ्या दहशतवादी हल्ल्यांचे नियोजन करण्यासाठी केला जाणार होता का, यादृष्टीनेही एसटीएफ अधिक तपास करत आहे. दोन्ही आरोपींची सध्या समोरासमोर चौकशी सुरू असून, या प्रकरणात आणखी काही जणांना अटक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सर्वोच्च न्यायालय धनुष्यबाण आपल्याला देईल नाहीतर चिन्ह गोठवेल, उद्धव ठाकरेंना विश्वास

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेल्या शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या सुनावणीसंबंधी उद्धव ठाकरे यांनी एक महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. सर्वोच्च न्यायालय शिवसेना पक्षचिन्ह आपल्यालाच देणार, आणि जरी चिन्ह आपल्याला मिळालं नाही तर ते गोठवलं जाईल, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी केला. तसेच सध्याचा काळ हा पक्षवाढीसाठी अनुकूल असून २०२९ च्या निवडणुकीच्या तयारीला लागा, असे आदेश उद्धव ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना दिले.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या जिल्हाप्रमुख आणि संपर्कप्रमुखांची बैठक शिवसेना भवनात पार पडली. यावेळी पक्षाच्या पुढील रणनीतीवर चर्चा करण्यात आल्याची माहिती आहे. त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी पक्ष आणि चिन्हाच्या लढाईत आपलाच विजय होईल असा विश्वास व्यक्त केल्याची माहिती आहे.

आपल्याला चिन्ह मिळालं नाही तर ते गोठवलं जाईल, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना कानपिचक्याही दिल्या. जबाबदारी पार पाडता येत नसेल तर पद सोडावे, अशा पदाधिकाऱ्यांना अन्य जबाबदारी दिली जाईल, असं उद्धव ठाकरे म्हणाल्याची माहिती आहे.

सध्याचा काळ हा पक्षवाढीसाठी अनुकूल असून पदाधिकाऱ्यांनी (पान ४ वर)

किसान सन्मान निधी योजनेला ५ वर्षांची केंद्र सरकारची मुदतवाढ

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळ आणि केंद्रीय कृषी सहकारी संस्था परिषदेची (सीसीए) बैठक झाली. समुद्रमंथन, सूर्य सरोवर योजना, पीएम सन्मान निधी आणि खेलो इंडिया यासह अनेक योजनांवर निर्णय घेण्यात आले. बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळाला माहिती दिली. त्यांनी सांगितले की, समुद्रमंथन नावाच्या एका मोठ्या योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. देशात तेल आणि वायू उत्पादनाचा शोध घेणे हा या योजनेचा उद्देश असून, त्यासाठी ८४,०८४ कोटी रुपयांचे बजेट मंजूर करण्यात आले आहे. देशातील तेल आणि वायूच्या वाढत्या मागणीसाठी ही योजना एक मोठे परिवर्तन घडवून आणणारी ठरेल.

त्यांनी सांगितले की, केंद्रीय मंत्रिमंडळाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (पीएम किसान सन्मान निधी योजना) आणखी पाच वर्षांसाठी वाढवली आहे. सरकारने या कालावधीसाठी ३.१५ लाख कोटी रुपयांचे बजेट मंजूर केले आहे.

वैष्णव यांनी सांगितले की, या निर्णयांपैकी सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे प्रधानमंत्री सूर्य सरोवर योजना (पीएमएसएसवाय). या योजनेअंतर्गत, पंतप्रधान मोदींनी जलस्रोतांच्या पृष्ठभागाचा वापर करून सौर ऊर्जा निर्मितीला मंजुरी दिली आहे. भारतामध्ये जलस्रोतांचा वापर करून १०२ गिगावॅट्स, म्हणजेच १,००,००० मेगावॅट्स सौर ऊर्जा निर्माण करण्याची क्षमता आहे. या योजनेअंतर्गत देशभरात एकूण ५,००० मेगावॅट तरंगती सौर पीव्ही (फोटोव्होल्टेइक) क्षमता निर्माण करण्याचे उद्दिष्ट असून, त्यासाठी पाच वर्षांच्या कालावधीत प्रति मेगावॅट १ कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य दिले जाईल.

देशातील क्रीडा संस्कृती आणि पायाभूत सुविधा मजबूत करण्यासंदर्भात मंत्रिमंडळाने आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्र्यांनी माहिती दिली की, खेळो इंडिया योजनेचा विस्तार करून पुढील पाच वर्षांसाठी २९,००० कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाची तरतूद करण्यात आली आहे.

त्यांनी आठवण करून दिली की, गेल्या दशकात खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी घेतलेल्या निर्णयामुळेच भारत ऑलिम्पिक, आशियाई खेळ आणि राष्ट्रकुल खेळांमध्ये असंख्य पदके जिंकत आहे.

या भरीव अर्थसंकल्पाचा मुख्य उद्देश आगामी ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक आणि विशेषतः २०३० मध्ये भारतात आयोजित होणाऱ्या राष्ट्रकुल खेळांसाठी भारतीय खेळाडूंची जागतिक दर्जाची तयारी सुनिश्चित करणे हा आहे.

एफडीएच्या कारवाईवर हॉटेल संघटना आक्रमक; थेट पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्र्यांना पत्र

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- राज्यात अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे आल्यापासून अन्नपदार्थ विक्रेते आणि हॉटेलविरोधात धडक कारवाई सुरू आहे. या कारवाईविरोधात आता हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यावसायिक आक्रमक झाले आहेत. कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा त्रुटी दुरुस्त करण्याची संधी न देता थेट परवाने निलंबित अथवा रद्द केले जात आहेत. हा आरोप करत देशातील तीन प्रमुख हॉटेल संघटनांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून या प्रकरणात मध्यस्थी करण्याची मागणी केली आहे.

'हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन (वेस्टर्न इंडिया), 'नॅशनल रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडिया' आणि 'इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन' या संघटनांनी संयुक्तपणे पंतप्रधान कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना हे निवेदन पाठवले आहे.

हॉटेल संघटनांनी स्पष्ट केले आहे की, त्यांचा एफडीएच्या कारवाईला किंवा अन्न सुरक्षेच्या नियमांना विरोध नाही. मात्र ज्या पद्धतीने ही कारवाई केली जात आहे, त्यावर त्यांचा आक्षेप आहे. ''अचानक परवाने निलंबित करणे किंवा रद्द करणे ही अत्यंत चिंतेची बाब आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता, चर्चा न करता आणि प्रक्रियेचे पालन न करता केली जाणारी ही कारवाई 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस' या संकल्पनेच्या पूर्णपणे विरोधात आहे,'' असे हॉटेल संघटनांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

कॉमनवेल्थ गेम्स २०२६ : बॉक्सिंगमध्ये भारताच्या खात्यात तिसरे सुवर्णपदक! साक्षी चौधरीची ऐतिहासिक कामगिरी

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- प्रीती पवार आणि जास्मिन लम्बोरिया यांनी ग्लासगो येथे सुरू असलेल्या कॉमनवेल्थ गेम्स २०२६मध्ये शनिवारी भारताच्या पदकांची सुरुवात दुहेरी सुवर्णपदकांनी केली. दुसरीकडे, जादूमणी सिंग याला पुरुषांच्या ५५ किलो गटाच्या अंतिम सामन्यात जाय डिक्सनकडून पराभव स्वीकारावा लागला आणि त्याने रौप्यपदकावर समाधान मानलं. प्रीतीने महिला ५४ किलो गटात कॅनडाच्या स्कार्लेट सवाना डेलगाडो हिचा ५-० अशा एकमताच्या निर्णयाने पराभव केला, तर जयस्मिनने महिला ५७ किलो गटाच्या अंतिम फेरीत गतविजेत्या उत्तर आयर्लंडच्या मायकेला वॉल्श हिला त्याच फरकाने नमवत सुवर्णपदक पटकावलं. विशेष म्हणजे, मागील कॉमनवेल्थ स्पर्धेत जयस्मिनने कांस्यपदक जिंकलं होतं.

बॉक्सिंगमध्ये भारताच्या पदकांची ही केवळ सुरुवात असून, शनिवारी आणखी सात भारतीय बॉक्सर विविध वजनी गटांच्या अंतिम फेरीत सुवर्णपदकासाठी रिंगमध्ये उतरणार आहेत. या ताफ्याचं नेतृत्व ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती लव्हलिना बोर्गोहेन करणार आहे. ड्रॉमुळे तिला अंतिम फेरीपूर्वी केवळ एकच सामना खेळावा लागला. भारताने ग्लासगो स्पर्धेसाठी १४ बॉक्सर पाठवले होते. त्यापैकी १० जण उपांत्य फेरीत पोहोचले आणि विशेष म्हणजे हे सर्व १० बॉक्सर अंतिम फेरीतही खेळताना दिसत आहेत. कॉमनवेल्थ गेम्स २०२६मध्ये भारताच्या उन्नती शर्मा हिने महिला ६३ किलो वजनी गटात कांस्यपदक पटकावलं. कांस्यपदकाच्या लढतीत उन्नतीने दक्षिण आफ्रिकेच्या स्काय नोस्टर हिचा इप्पोन (१००-०) ने एकतर्फी पराभव करत शानदार विजय मिळवला. या प्रभावी कामगिरीसह उन्नतीने भारताच्या पदकसंख्येत आणखी एका पदकाची भर घालत स्पर्धेतील आपली दमदार मोहीम संस्मरणीय केली. साक्षी चौधरीने रूबी व्हाईटचा पराभव करत भारताला बॉक्सिंगमध्ये तिसरं सुवर्णपदक पटकावून दिलं आहे. साक्षी चौधरी हिने महिला ५१ किलो गटाच्या अंतिम सामन्यात इंग्लंडच्या रुबी व्हाइट हिचा ५-० अशा एकमताच्या निर्णयाने पराभव करत ग्लासगो कॉमनवेल्थ गेम्स २०२६मध्ये सुवर्णपदक पटकावलं. याआधी प्रीती पवार आणि जास्मिन लम्बोरिया यांनी अनुक्रमे महिला ५४ किलो आणि ५७ किलो गटात सुवर्णपदक जिंकत भारताची मान उंचावली होती. साक्षीच्या विजयामुळे बॉक्सिंगमध्ये भारताची सुवर्णपदकांची मालिका आणखी भक्कम झाली.

मला चंद्रकांत पाटलांच्या मेंदूवरचे फिंगर प्रिंट बघायचेत, हा कसला उच्च तंत्रशिक्षण मंत्री? राज ठाकरेंची घणाघाती टीका

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- सध्याच्या काळात नव्या जेन झी पिढीला अपेक्षित असणाऱ्या पद्धतीने विचार करायला पाहिजे. त्यासाठी जुन्या भ्रामक कल्पना सोडून दिल्या पाहिजेत. आमच्या काळात आई सांगायची की, डोक्याला रात्री तेल लावत जा, बुद्धी तल्लख होते. पण एका माणसाने आयुष्यभर केसाला तेल चोपड चोपड चोपडलं, पण त्याला बुद्धी आली नाही. या माणसाचा प्रत्येक केस स्वतंत्र उमेदवारासारखा उभा असतो. अशा शब्दांत मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांना लक्ष्य केले.

चंद्रकांत पाटील यांच्यासारखे व्यक्ती आमचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री आहेत. आपण काय बोलतोय, जग कुठे चाललंय, याचा विचार करायला पाहिजे. आपण महाराष्ट्राचे शिक्षण आणि तंत्रज्ञान मंत्री आहोत. पण चंद्रकांत पाटील म्हणतात की, आंदोलनात जे दगड फेकण्यात आले आहेत, त्या दगडावरच्या फुटप्रिंटस आधारशी लिंक केल्या जाणार आहेत, असे चंद्रकांत पाटील म्हणतात. मला चंद्रकांत पाटील यांच्या मेंदूवरचे फिंगर प्रिंट बघायचे आहेत. कोल्हापूरकरांनी या माणसाला ज्ञान मिळावं म्हणून कोल्हापूरवरुन पुण्यात पाठवलं, जे शिक्षणाचं माहेरघर आहे, पण तिथेही यांचं काही झालं नाही. आता असे शिक्षणमंत्री म्हटल्यावर जेन झी पिढीचा पारा चढणार की नाही? ते म्हणत असतील की, अशी माणसं आमच्या नशिबी आणून ठेवलेत, अशी टीका राज ठाकरे यांनी केली.

चार वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून संपवणाऱ्या नराधमाला मरेपर्यंत फाशीची शिक्षा; दीड वर्षात सुनावणी पूर्ण

सांगली दि.१ (प्रतिनिधी) सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील करजगी येथे चार वर्षांच्या निष्पाप चिमुरडीवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करणाऱ्या नराधमाला न्यायालयाने मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली आहे. पुरावा नष्ट करण्यासाठी बालिकेचा मृतदेह लोखंडी पेटीत लपवून ठेवणाऱ्या पांडुरंग सोमना कळळी (वय ४६) या आरोपीला सांगलीच्या जिल्हा व सत्र न्यायालयातील बाल अत्याचार प्रतिबंधक विशेष न्यायालयाने दोषी ठरवून ही कठोर शिक्षा सुनावली आहे.

पुण्याच्या नसरापूर येथील घटनेनंतर राज्यात चिमुरड्या मुलीच्या अत्याचार प्रकरणात अवघ्या दीड वर्षात जलदगती न्यायालयात सुनावणी पूर्ण होऊन फाशीची शिक्षा सुनावण्यात आलेली ही दुसरी मोठी घटना ठरली आहे. या प्रकरणी सरकारी वकील प्रमोद भोकरे यांनी सरकारची बाजू मांडली.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित चिमुरडी ही आपल्या आजीकडे राहत होती. तिची आई कर्नाटकातील मुधोळ येथे माहेरी गेली होती, तर वडील बांधकाम मजुरीसाठी रत्नागिरीत गेले होते. २ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ही मुलगी घराबाहेर खेळत असताना अचानक गायब झाली. कुटुंबीय आणि गावकऱ्यांनी शोध घेऊनही ती न सापडल्याने पोलिसांना तात्काळ पाचारण करण्यात आले.

मुलीच्या घराच्या मागे राहणारा आरोपी पांडुरंग कळळी हा स्वतः गावकऱ्यांसोबत मुलीच्या शोधमोहिमेत सामील झाला होता. मात्र, त्याच्या संशयास्पद हालचाली पाहून पोलिसांनी त्याची चौकशी केली. सुरुवातीला त्याने पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, पण पोलिसी खाक्या दाखवताच त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याने पीडितेचा मृतदेह आपल्या घरातील लोखंडी पेटीत प्लास्टिकच्या पिशवीत बांधून ठेवल्याचे उघडकीस आले.

या क्रूर घटनेमुळे संपूर्ण सांगली जिल्ह्यात प्रचंड संतापाची लाट पसरली होती. आरोपीला कठोर फाशीची शिक्षा व्हावी यासाठी विविध सामाजिक संघटनांनी मोर्चे आणि आंदोलने केली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी अत्यंत वेगाने तपास करत अवघ्या १५ दिवसांत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

सुनावणीदरम्यान सरकारी वकील प्रमोद भोकरे यांनी आरोपीचा जुना गुन्हेगारी पार्श्वभूमीचा रेकॉर्ड न्यायालयात मांडत, अशा नराधमाला समाजाच्या हितासाठी फाशीचीच शिक्षा योग्य असल्याचे सांगत जोरदार युक्तिवाद केला. न्यायालयाने सर्व पुरावे आणि साक्षीदारांच्या आधारे पांडुरंग सोमना कळळी याला दोषी ठरवून मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली. या निर्णयाचे पीडित कुटुंबासह नागरिकांनी स्वागत केले आहे.

'लाडक्या बहिणीं'नंतर आता एसटीचे लाभार्थ्यांचे सर्वेक्षण; सवलत मूल्य प्रतिपूर्ती, लेखापरीक्षण पडताळणीचे परिवहनचे निर्देश

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- राज्य सरकारने 'लाडकी बहीण' योजनेतील लाभार्थ्यांच्या छाननीनंतर आता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळातील सवलतींचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांच्या तिकीट सवलत प्रतिपूर्तीवर लक्ष केंद्रित केले आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि इतर विविध प्रवर्गातील लाभार्थी प्रवाशांची माहिती तपासून सवलत मूल्य प्रतिपूर्तीच्या दाव्यांची अचूकता पडताळण्याचे निर्देश परिवहन विभागाने दिले आहेत. एसटी महामंडळाची ढासळलेली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी वित्तीय शिस्त, लेखापरीक्षण आणि महसूलवाढीच्या उपाययोजनांवर सरकारने भर दिला आहे.

परिवहन विभागात २९ जुलै रोजी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत उपसचिव, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी महामंडळाची आर्थिक स्थिती, वाढती देणी, कर्ज, उत्पन्नाचे स्रोत, पुढील पाच वर्षांचे आर्थिक नियोजन आणि कर्मचारी स्थितीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) प्रकल्पांचे पुनर्मूल्यांकन, महामंडळाच्या मालमत्तेचा व्यावसायिक वापर आणि महसूलवाढीसाठी तातडीच्या उ

दिल्लीत पायलट गन आणि बिहारमध्ये एके-४७ विद्यार्थ्यांवर चालविने ही कुठली लोकशाही?

जेन-झी पुढे सरकार झुकले खरे; परंतु सरकारने दिलेले आश्वासने पुर्ण करतात की नाही यात अजूनही विद्यार्थांच्या व देशाच्या १४५ कोटी जनतेच्या मनात शंका निर्माण होत आहे!कारण जे काम सुरक्षा विभागाने करायला नको ते काम सुरक्षा विभागाने करून लोकशाहीला आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला कलंकीत केले आहे.कारण दिल्लीत पायलट गनचा वापर करून सरकारवर चहुबाजुंनी प्रश्न चिन्ह उपस्थित होत आहे,तर बिहारमध्ये सीवान येथे सुरक्षा विभागाने आंदोलकांवर एके -४७ चा वापर करून देशाला व संविधानाला धक्का दिला असून घृणास्पद कार्य केले आहे.पायलट गन किंवा एके-४७ आतंकवादी कारवाईसाठी किंवा खुंखार गुन्हेगारांसाठी वापरली जाते.परंतू ती विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला दरम्यान वापरण्यात आली.याची सविस्तर माहिती सरकारने व गृहमंत्रालयाने १४५ कोटी जनतेला दिली पाहिजे. कारण संपूर्ण सुरूक्षा यंत्रणा गृहमंत्रालयाच्या अंतर्गत येत असते. आंदोलन पांगवण्यासाठी सुरक्षा यंत्रणांजवळ अनेक उपाय आहेत यामध्ये सर्वप्रथम वॉटर कॅनलचा वापर केला जातो.परंतु या आंदोलनात थेट लाठीचार्ज, पायलट गन, बिहारमध्ये एके -४७ चार वापर करण्यात आला.देशातील युवा पिढीला आपल्या हक्कांसाठी लढण्याचा संपूर्ण अधिकार संविधानाने दिलेला आहे त्या संविधानानुसार आंदोलन सुरू असतांना बळाचा वापर करण्यात आला.विद्यार्थांना आपल्या न्यायासाठी तब्बल ३५ दिवस कडवा संघर्ष करावा लागला आणि ३६ व्या दिवशी विद्यार्थ्यांना न्याय मिळाला.सरकारला सत्तेचा एवढा अहंकार चढला होता की, हे राजीनामा देणारे सरकार नाही असे घमंड त्यांच्यात निर्माण झाले होते आणि त्यांच्या मंत्र्यांनी बोलून सुध्दा दाखविले होते.अशी बतावणी करणाऱ्या भाजप नेतृत्वाला देशातील युवा शक्तीपुढे नमते घ्यावे लागले.विद्यार्थांचे आंदोलन फक्त दिल्ली पुरतेच सिमित नव्हते तर हे आंदोलन देशातील अनेक राज्यात तिव्र झाले होते. दिल्लीप्रमाणेच देशातील इतर राज्यांमध्ये सरकारने बळाचा वापर केला.दिल्लीतील आंदोलना दरम्यान सुरक्षा विभागाने बळाचा वापर करतांना पायलट गनचा वापर केला तर, बिहारमध्ये एके ४७ चा वापर केला.म्हणजे विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पांगवण्यासाठी अशा भयानक शस्त्राचा वापर करने म्हणजे सरकारची क्रूरताच म्हणावी लागेल.कारण कोणत्याही अधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय अत्याधुनिक शस्त्राचा वापर होऊच शकत नाही आणि तो आंदोलना दरम्यान झाला आहे याची कठोर चौकशी व्हायला हवी.आता प्रश्न आहे की, सरकारने सीजेपीला दिलेले संपूर्ण आश्वासन केव्हा पर्यंत पूर्ण होते.कारण सरकारने दिलेले संपूर्ण आश्वासन देशातील प्रत्येक राज्यांना लागू होते.दिल्लीसह राज्यातील अनेक भागातील विद्यार्थ्यांवर दाखल केलेले संपूर्ण फौजदारी गुन्हे मागे घेतले की नाही यात शंका कुशंका विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नीट-यूजी परीक्षेची पेपरफुटी प्रकरणी जलदगती न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय घेतला कारण पेपरफुटी प्रकरणांमध्ये जलद सुनावणी व्हावी याचे मनापासून स्वागत. हा निर्णय सरकारने अगोदरच घेतला असता व धर्मेंद्र प्रधानचा राजीनामा घेतला असता तर विद्यार्थ्यांना रस्त्यावर येण्याची वेळ आली नसती हेही तितकेच सत्य आहे.सरकारने नीट-यूजी पेपर फुटीसाठी स्थापन केलेल्या फास्ट ट्रॅक कोर्टात पहिल्याच दिवशी सीबीआय वकिल गैरहजर होते त्यामुळे विद्यार्थ्यांना जलदगतीने न्याय मिळेल की नाही यातही शंका निर्माण होते. पेपरफुटी हा विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळला जाणारा गोरखधंदा म्हणावा लागेल आणि याचा उगम लालसेपोटी भ्रष्टाचारातुनच झालेला आहे हेही तितकेच सत्य आहे. देशात हे जे काही चालले आहे ते फक्त वाममार्गाने पैसा कमविण्यासाठी त्यामुळे आज देशात फक्त पेपरफुटीच नाही अनेक सरकारी विभाग भ्रष्टाचाराने माखलेले दिसून येतो म्हणजेच सर्वत्र फुटीच-फुटी दिसून येईल.महाराष्ट्रात माननीय तुकाराम मुंढे यांची ज्या-ज्या क्षेत्रात आपले पाय रोवले त्या-त्या क्षेत्रातील भ्रष्टाचार उघडकीस आणला. यावरून स्पष्ट होते की देशात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचे जाळे विणल्या गेले आहेत आणि याचे संपूर्ण धागेदोरे हे राजकीय पुढाऱ्यांच्या हातात व उच्च पदस्थ अधिकाऱ्याच्या हातात आहे.भ्रष्टाचार करण्यामध्ये सरकारमध्ये बसलेले मोठमोठे राजकीय पुढारी व नामी अधिकारी सुद्धा सहभागी आहेत.कारण यांच्याजवळ असलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आलीच कोठून हा मोठा गहन प्रश्न आजही उपस्थित होतो.आजही जगात भारत भ्रष्टाचाराच्या बाबतीत अव्वल स्थानावर असल्याचे दिसून येते आणि पेपर फुटीचा प्रकार हा भ्रष्टाचाराचाच मोठा भाग आहे.सरकारने असे समजू नये जंतरमंतर खाली झाले म्हणून आम्ही आपल्याच पध्दतीने काम करू ही सरकारची मोठी भुल ठरेल.त्यामुळे सरकारने विद्यार्थ्यांना दिलेल्या आश्वासनांची ताबडतोब पुर्तता करावी व ही पुर्तता देशातील संपूर्ण राज्यातील आंदोलकांना लागू राहील याचीही खबरदारी सरकारने घ्यावी.सरकार म्हणते की, विद्यार्थ्यांच्या हितापेक्षा कोणतेही पद मोठे नाही.म्हणून धर्मेंद्र प्रधानचा राजीनामा दिला.अशा पध्दतीचे लिपापोती लावणारे वक्तव्य सरकारने बंद करावे.सरकारने लक्षात ठेवले पाहिजे की, प्रथम देश व देशाची १४५ कोटी जनता नंतर मंत्री आणि राजकारण. सरकारने लाठीचार्ज व बळाचा वापर केल्यानंतर धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला आणि आता सरकार मोठ्या ऐटीत सांगते की विद्यार्थ्यांच्या हितासाठी राजीनामा दिला अशा भुलथापा सरकारने मारू नये कारण जेन-झी हुशार आहे त्यांना सर्वच गोष्टी चांगल्या प्रकारे समजते.सरकारने परीक्षा व्यवस्था पारदर्शक, सुरक्षित बनविण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून टास्क फोर्सचे गठन केले यामुळे परीक्षा व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.त्याच पध्दतीने देशातील वाढत्या भ्रष्टाचाराची जळेमुळे खुप दुरवर पोहोचली आहे आणि सरकार यावर अजूनपर्यंत नियंत्रण ठेवू शकली नाही म्हणूनच पेपर फुटी झाली.कारण यात मोठ्या प्रमाणात आजी माजी आमदार-खासदार, मंत्री व राजकीय पुढारी लिप्त आहेत.यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून टास्क फोर्सचे ताबडतोब गठन करून भ्रष्टाचाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या पाहिजे आणि पेपर फुटीसारख्या प्रकरणावर आळा घातला पाहिजे.जय हिंद!

– रमेश कृष्णराव लांजेवार
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

सोनम वांगचूक केंद्रस्थानी

नीट पेपर फुटीनंतर विद्यार्थी जगतात हल्लकल्लोळ माजला. वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या या परीक्षेला तेवीस लाखापेक्षा जास्त विद्यार्थी आपले भविष्य आजमावत होते. पेपर फुटी आणि परीक्षा स्थगित होणे यामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर परिणाम होणारच. पेपर फुटीनंतर काही विद्यार्थ्यांनी आत्महत्याही केल्या. अहोरात्र अभ्यास करून परीक्षेला सामोरे जाण्यापुर्वीच पेपर फुटणार असतील तर दोष कुणाचा ? नीट किंवा अन्य स्पर्धा परिक्षांचे पेपर फुटण्याचे प्रकार सतत घडत आहेत. पैशाच्या लोभापायी त्यात भले- भले गुंतले आहेत. शाळेच्या शिक्षक, मुख्याध्यापकांपासून ते कोचिंग क्लासच्या संचालकांपर्यंत अनेकांना अटक झाली आहे. वारंवार होणाऱ्या पेपर फुटीच्या घटनांची नैतिक जबाबदारी स्वीकारून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीला जोर धरू लागला आहे. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी अभिजीत दीपकेच्या कॉक्रोच जनता पार्टीने दिल्लीत जंतर मंतरवर सुरू केलेल्या आंदोलनात लडाखचे पर्यावरणवादी नेते सोनम वांगचूक मैदानात उतरले व त्यांनी आमरण उपोषण सुरू केले.

सोनम वांगचूक यांच्या आमरण उपोषणाकडे देशातील मिडिया दुर्लक्ष केले. जंतर मंतरवरील वांगचूक यांच्या आमरण उपोषणाला प्रसिध्दी देऊन सरकारला कोण दुखवणार ? सन २०११ मधे अण्णा हजारे यांनी लोकपालसाठी दिल्लीत उपोषण केले तेव्हा त्याला वृत्तवाहिन्यांनी अहोरात्र प्रसिध्दी दिली. अण्णांच्या आंदोलनाचे थेट प्रक्षेपण चालू होते. अण्णांच्या आंदोलनाने काँग्रेसप्रणित युपीए सरकारची बदनामी होत होती व अण्णांच्या आंदोलनाला भाजपाचा मागून भक्कम पाठिंबा होता. अण्णा हजारे यांच्या उपोषण काळात तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग सरकारमधील मंत्री त्यांना भेटून चर्चा करीत होते, विलासराव देशमुख हे सुध्दा सरकारच्यावतीने दोन वेळा अण्णांना भेटले. अण्णांनी उपोषण सोडावे म्हणून युपीए सरकारचे मंत्री त्यांना विनंती करीत होते. अण्णांच्या आंदोलनाला पाठिंबा देणारे किरण बेदी, अमिर खान आज कुठे आहेत? वांगचूक यांच्याशी सरकारच्यावतीने संवाद करायला कोणी पुढे येत नाही. वांगचूक हे सरकारला ब्ल'कमेल करीत आहेत, असा आरोप भाजपा करीत आहे.

मोदी सरकारनेच सोनम वांगचूक यांच्या पर्यावरणवादी कामाचा गौरव म्हणून पदम पुरस्कार दिला होता. नंतर त्यांनी लडाखला



पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा म्हणून केलेल्या आंदोलनात हिंसाचार झाल्यावर त्यांना देशद्रोही ठरवून जोधपूरच्या तुरूंगात १७० दिवस डांबले. जम्मू- काश्मीरला विशेषाधिकार देणारे ३७० कलम काढून टाकल्यावर याच वांगचूक यांनी मोदी सरकारचे अभिनंदन केले होते. आता सरकारला वांगचूक नकोसे झाले असावेत. तीन आठवड्याच्या उपोषणाने त्यांची प्रकृती कमालीची खालावली आहे. मग त्यांना इस्पितळात नेऊन ऑक्सिजन व सलाईनच्या नळ्या लावून त्यांचे प्राण वाचवणार आहेत का ? संसदेच्या पावसाळी अधिवेशनच्या तोंडावर वांगचूक यांचे आमरण उपोषण सरकारला अडचणीचे ठरले आहे.

जंतर मंतरवर अरविंद केजरीवाल , सुप्रिया सुळे, पवन खेडा, डिम्पल यादव, शबाना आजमी, नसरूद्दीन शहा, स्वरा भास्कर, सबीना दिलैक, रत्ना पाठक, अरूंधती रॉय अशा अनेकांनी सोनम वांगचूक यांची भेट घेऊन उपोषण सोडावे अशी विनंती केली पण लोकसभेतील विरोधी नेते राहुल गांधी तिकडे फिरकले नाहीत, याचीच चर्चा मोठी झाली. वांगचूक म्हणजे दुसरा गांधी असे म्हटले जात आहे, मग राहुल गांधी त्यांना पाठिंबा का देत नाहीत ? असा प्रश्न विचारला जात आहे.

वांगचूक म्हणतात, मुझे उम्मीद हैं की, राहुल गांधी आयेंगे, नही आए, तो उनका छोटापन होगाः वांगचूक यांचे असे बोलणे काँग्रेसला खटकले. पेपर फुटीच्या मुद्यावर काँग्रेसची एनएसयूआय व युवक काँग्रेस रस्त्यावर आंदोलन करीत आहेत. पण मिडियातून त्याला प्रसिध्दी मिळत नाही. काँग्रेसची महागाई, बेरोजगारी, पेपर फुटी, जीएसटी, मणिपूर, आदी विषयांवर सतत आंदोलने चालू आहेत, तेव्हा वांगचूक यांना राहुल गांधीची आठवण झाली नाही. राहुल गांधींनी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत चार हजार किमी ची भारत जोडो यात्रा केली तेव्हा त्यांनी कुणाचा पाठिंबा मागितला नव्हता, याचीही आठवण करून दिली जात आहे.

प्रभु रामचंद्राची तिजोरी लुटली जात असताना शांत बसणारे सरकार नागरिकाच्या आंदोलनाला काय किमत देणार? असा प्रश्न मनसेचे बॉस राज ठाकरे यांनी विचारला आहे. देशातील आंदोलने चिरडण्याचा घाट सरकारने घातला आहे, अशी टीका त्यांनी केली आहे.

१९५६ मधे लाल बहादूर शास्त्री हे रेल्वेमंत्री होते. त्यावेळी तामिळनाडूत झालेल्या रेल्वे अपघातात दिडशे लोक मृत्युमुखी पडले. शास्त्री यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून कोणताही विलंब न लावता मंत्रीपदाचा आपणहून राजीनामा दिला होता. आता नैतिक जबाबदारी स्वीकारून कोणीही मंत्री आपणहून राजीनामा देण्यासाठी पुढे येत नाहीत आणि त्यांनी राजीनामा द्यावा असे त्यांचे हायकमांडही त्यांना सांगतही नाही. २०१५ मधे राजस्थानच्या मुख्यमंत्री वसुंधरा राजे व परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांच्या राजीनाम्याच्या मागणी केली गेली होती. तेव्हा राजनाथ सिंह म्हणाले होते, मोदी सरकारमधे राजीनामे होत नाहीतः गेल्या बारा वर्षात मोदी सरकारमधील एकाही मंत्र्याने नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिलेला नाही. केवळ परराष्ट्र राज्यमंत्री एम. जे. अकबर यांनी राजीनामा दिला, कारण त्यांच्यावर मी टू मधे सापडल्याचे गंभीर आरोप झाले होते. मणिपूरच्या इरोन चानू शर्मिला यांनी केलेले उपोषण १६ वर्षे चालले. सशस्त्र दलाला अस्फा कायद्यानुसार केंद्र सरकारने विशेषाधिकार दिले, त्याच्या निषेधार्थ ४ नोव्हेंबर २००० रोजी उपोषण सुरू केले. तिसऱ्याच दिवशी यांच्यावर पोलिसांनी आत्महत्येचा गुन्हा दाखल केला व त्यांना अटक करून इस्पितळात नेले. तेथे जबदस्तीने फिडींग ट्यूब मधून त्यांना द्रव पदार्थ दिले. ९ ऑगस्ट २०१६ रोजी त्यांनी आपले उपोषण संपवल्याचे जाहीर केले.

सोनम वांगचूक यांनी लडाख मधील जनतेला अधिकार व हक्क मिळावेत यासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली. (१) दि. २६ जानेवारी २०२३ रोजी सोनम यांनी लडाखला संपूर्ण राज्याचा दर्जा मिळावा यासाठी १८ हजार फूट उंचीवर असलेल्या खारदुंगला खिंडीत पाच दिवसांचे उपोषण केले. तेथे उणे ४० अंश सेल्शिअस तापमान होते. सरकारने त्यांना घरातच नजर कैदेत ठेवले. (२) दि. १८ जून २०२३ रोजी वांगचूक यांनी लेह येथील एनडीएस स्टेडियम मधे पुन्हा उपोषण केले व पाच दिवसांनी सोडले. (३) सप्टेंबर २०२४ मधे सोनम यांनी लेह ते दिल्ली अशी एक हजार किमी ची १३० लोकांसह पदयात्रा काढली. तीस सप्टेंबर रोजी पोलिसांनी त्यांना सिंधू सीमेवर रोखले. (४) ५ ऑक्टोबर २०२४ पासून दिल्लीतील लडाख भवन येथे त्यांनी उपोषण सुरू केले. स्टुडंटस फेरडेशन ऑफ इंडियाने त्यांना पाठिंबा दिला होता. गृहमंत्रालयाने आश्वासन दिल्यानंतर २१ ऑक्टोबर २०२४ रोजी त्यांनी उपोषण सोडले. (५) २५ सप्टेंबर २०२५ रोजी वांगचूक यांना हिंसाचार भडकविल्याच्या आरोपावरून पोलिसांनी अटक केली, राष्ट्रीय सुरक्षा अधिनियमाखाली (एनएसए) त्यांना जोधपूरच्या तुरूंगात पाठवण्यात आले. १७० दिवसांनंतर १४ मार्च २०२६ रोजी त्यांची तुरूंगातून सुटका झाली. सोनम यांचे वडिल सोनम वांग्याल हे १९८४ मधे, ४२ वर्षापूर्वी लडाखमधील समुहाला एसटी चा दर्जा मिळावा म्हणून उपोषणाला बसले होते तेव्हा इंदिरा गांधींनी त्यांची भेट घेऊन त्यांचे उपोषण सोडवले होते. ते जम्मू काश्मीर विधिमंडळात अनेक वर्षे आमदार होते. १९७५ मधे ते राज्यात मंत्री होते. सोनम वांगचूक म्हणतात- मै ना गांधी हूँ , और ना हिरो, मै बस एक आम नागरीक हूं

– डॉ. सुकृत खांडेकर

सारनाथला जागतिक वारसा दर्जा : बुद्धाच्या धम्मभूमीचा सन्मान, भारताच्या विवेकपरंपरेचा गौरव!

सारनाथच्या पवित्र भूमीला युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळाल्याची बातमी ही केवळ एका ऐतिहासिक स्थळाच्या गौरवाची बातमी नाही तर ती भारताच्या बौद्ध, धम्म आणि मानवतावादी परंपरेला जगाने दिलेली मान्यता आहे. ज्या भूमीवर तथागत गौतम बुद्धांनी ज्ञानप्राप्तीनंतर प्रथम धम्मचक्र प्रवर्तन केले, ज्या भूमीतून करुणा, समता, प्रज्ञा आणि अहिंसेचा संदेश जगाच्या दिशेने प्रवासाला निघाला, त्या सारनाथला मिळालेला हा सन्मान प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण आहे. पण हा अभिमान केवळ सोशल मीडियावरील पोस्ट, अभिनंदनाचे संदेश आणि राजकीय श्रेयवादापुरता मर्यादित राहता कामा नये. सारनाथच्या दगडांमध्ये कोरलेला बुद्धाचा विचार आपण आपल्या वर्तमानात किती जिवंत ठेवतो, हा खरा प्रश्न आहे. सारनाथ म्हणजे केवळ पुरातत्त्वीय अवशेष नाहीत. तो भारतीय इतिहासातील एका महान वैचारिक क्रांतीचा साक्षीदार आहे. सिद्धार्थ गौतमांनी बोधगया येथे ज्ञानप्राप्ती केल्यानंतर सारनाथ येथे आपल्या धम्माचा पहिला उपदेश केला. या घटनेला इतिहासात 'धम्मचक्र प्रवर्तन' म्हणून ओळखले जाते. एका व्यक्तीच्या आत्म ज्ञानाचा प्रवास तेथून पुढे संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा मार्ग बनला. बुद्धांनी माणसाला जन्माच्या आधारावर श्रेष्ठ-कनिष्ठ ठरवणाऱ्या व्यवस्थेला आव्हान दिले. कर्मकांडापेक्षा आचरणाला, अंधश्रद्धेपेक्षा प्रज्ञेला, हिंसेपेक्षा करुणेला आणि भेदभावापेक्षा समतेला महत्त्व दिले. म्हणूनच सारनाथचा जागतिक वारसा दर्जा हा बुद्धाच्या भूमीचा सन्मान असला तरी त्याहून मोठे काम आता आपल्या हातात आहे, बुद्धाचा वारसा जपण्याचे!

जगात युद्धे पेटली आहेत. धार्मिक कट्टरता वाढत आहे. माणूस माणसाच्या विरोधात उभा केला जात आहे. द्वेषाची भाषा राजकारणाच्या केंद्रस्थानी येत आहे. सोशल मीडियावर खोट्या माहितीचा आणि अफवांचा पूर आहे. अशावेळी जगाला बुद्धाची गरज आहे. बुद्धांचा धम्म हा कोणत्याही एका जात, धर्म किंवा देशापुरता मर्यादित नाही. तो मानवी दुःख समजून घेण्याचा आणि त्यातून मुक्तीचा मार्ग शोधण्याचा विचार आहे. म्हणूनच सारनाथची ओळख एका प्राचीन वास्तूइतकी मर्यादित ठेवणे म्हणजे त्या भूमीच्या ऐतिहासिक आणि वैचारिक महत्त्वावर अन्याय करणे होय. सारनाथच्या भूमीवरून निघालेला धम्म पुढे भारताच्या सीमा ओलांडून आशिया खंडाच्या अनेक देशांमध्ये पोहोचला. बुद्धाच्या विचारांनी श्रीलंका, म्यानमार, थायलंड, जपान, चीन, कोरिया, तिबेट आणि जगातील अनेक भागांतील समाजजीवनावर प्रभाव टाकला.



भारतातून निघालेल्या या प्रज्ञेच्या प्रकाशाने जगाला करुणेचा आणि शांततेचा मार्ग दाखवला. आज जग भारताकडे 'विश्वगुरू' म्हणून पाहण्याची चर्चा करते; पण विश्वगुरू होण्याचा अर्थ केवळ प्राचीन गौरवाच्या कथा सांगण्यात नाही. जगाला जेव्हा द्वेषाऐवजी मैत्री, युद्धाऐवजी शांतता आणि अंधानुकरणाऐवजी विवेकाची गरज आहे, तेव्हा बुद्धाचा मार्ग जगासमोर प्रामाणिकपणे मांडणे हीच खरी विश्वगुरुत्वाची कसोटी आहे.

सारनाथचा हा गौरव भारतीय संविधानाच्या मूल्यांशीही जोडलेला आहे. कारण आधुनिक भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाच्या विचारांना नव्या सामाजिक संदर्भात पुनर्जीवित केले. बुद्धांनी प्रज्ञा, करुणा आणि समतेचा मार्ग दाखवला, बाबासाहेबांनी त्याला स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेच्या सामाजिक-राजकीय मूल्यांशी जोडले. त्यामुळे सारनाथकडे पाहताना केवळ इतिहासाकडे पाहण्यापेक्षा भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रवासाकडे पाहणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर जातिव्यवस्थेच्या अमानवी बंधनांविरुद्ध संघर्ष केला. त्यांनी शिक्षण, संविधान आणि लोकशाहीच्या माध्यमातून वंचित समाजाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला. अखेर बुद्धाच्या धम्माचा स्वीकार करून त्यांनी भारतीय समाजाला एक नवा वैचारिक पर्याय दिला. म्हणूनच सारनाथचा सन्मान हा बाबासाहेबांच्या विचारांच्या अनुयायांसाठीही विशेष अर्थपूर्ण आहे. बुद्धाने धम्मचक्र फिरवले आणि बाबासाहेबांनी आधुनिक भारतात सामाजिक समतेचे चक्र गतिमान केले, असे म्हटले तर ते अतिशयोक्ती ठरणार नाही. पण आज आपल्याला स्वतःला विचारावे लागेल. बुद्धाच्या देशात आपण बुद्धाचा विचार किती स्वीकारला आहे?

जर बुद्धाच्या नावाने उत्सव साजरे करायचे आणि त्याच वेळी जातीय भेदभाव कायम ठेवायचा असेल, तर तो बुद्धाचा सन्मान नाही. जर बाबासाहेबांच्या पुतळ्याला हार घालायचा आणि त्यांच्या संविधानिक मूल्यांना मात्र दुर्लक्षित करायचे असेल, तर ती बाबासाहेबांप्रती निष्ठा नाही. जर सारनाथला जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळाल्याचा आनंद व्यक्त करायचा, पण समाजात द्वेष आणि विषमता वाढवायची असेल, तर हा गौरव केवळ देखावा ठरेल. बुद्धाची खरी शिकवण ही माणसाला प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य देते. 'तुम्ही स्वतः विचार करा, तपासा आणि मग स्वीकारा,' हा बुद्धांचा विवेकवादी दृष्टिकोन आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचा आहे. अंधश्रद्धा, चमत्कार, बुवाबाजी आणि खोट्या प्रचाराच्या काळात बुद्धाची प्रज्ञा आपल्याला वैज्ञानिक दृष्टिकोन शिकवते. आजच्या डिजिटल युगात माहिती क्षणार्धात पसरते; पण प्रत्येक माहिती सत्य असेलच असे नाही. म्हणून बुद्धाची शिकवण म्हणजे केवळ प्राचीन ग्रंथात जतन करण्याची गोष्ट नाही तर ती आजच्या समाजाच्या मानसिक आरोग्यासाठी आणि लोकशाहीच्या भविष्यासाठी आवश्यक असलेली विचारपद्धती आहे.

सारनाथचा जागतिक वारसा दर्जा मिळाल्यानंतर आता केंद्र आणि राज्य सरकारांसमोरही मोठी जबाबदारी आहे. जागतिक वारसा स्थळाचा दर्जा हा केवळ पर्यटन वाढविण्याचा मार्ग म्हणून पाहता कामा नये. पुरातत्त्वीय वारशाचे संवर्धन, पर्यावरणाचे रक्षण, स्थानिक नागरिकांचा सहभाग, ऐतिहासिक स्थळांची शास्त्रीय माहिती आणि पर्यटकांसाठी दर्जेदार सुविधा यांचा समतोल साधला पाहिजे. वारसा स्थळांचे व्यापारीकरण करताना त्यांच्या आत्म्याचा नाश होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. सारनाथला जगभरातून येणाऱ्या पर्यटकांना केवळ प्राचीन वास्तू दाखवून उपयोग नाही. त्यांना बुद्धाचा विचार समजावून सांगणे आवश्यक आहे. धम्मचक्र प्रवर्तनाचा सामाजिक अर्थ, समतेचा संदेश, करुणेचे महत्त्व आणि मानवी स्वातंत्र्याची भूमिका नव्या पिढीपर्यंत पोहोचली पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून डिजिटल संग्रहालये, बहुभाषिक माहिती केंद्रे आणि विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम विकसित केले जाऊ शकतात. कारण वारसा जतन करणे म्हणजे केवळ दगड जतन करणे नव्हे, तर त्या दगडांनी सांगितलेला विचार जिवंत ठेवणे होय.

आज सारनाथला मिळालेला जागतिक सन्मान आपल्याला एक ऐतिहासिक संधी देत आहे. बुद्धाचा भारत पुन्हा जगासमोर उभा करण्याची ही वेळ आहे. मात्र त्यासाठी घोषणा नव्हे, तर कृती आवश्यक आहे. आपल्या शाळांमध्ये विवेकवाद वाढला पाहिजे. महाविद्यालयांमध्ये चिकित्सक विचारांना प्रोत्साहन मिळाले पाहिजे. समाजात जातीय आणि धार्मिक द्वेषाला नकार दिला पाहिजे. संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये प्रत्यक्ष जीवनात उतरली पाहिजेत. सारनाथला जागतिक वारसा दर्जा मिळणे हा इतिहासाचा गौरव आहे, पण बुद्धाचा विचार आपल्या वर्तमानात जिवंत ठेवणे ही भविष्याची जबाबदारी आहे. ज्या भूमीवरून बुद्धांनी धम्मचक्र फिरवले, त्या भूमीचा सन्मान जगाने केला आहे. आता आपण त्या धम्म चक्राला आपल्या विचारांत, आचरणात आणि समाजव्यवस्थेत फिरवणार आहोत का? हा प्रश्न प्रत्येक भारतीयाने स्वतःला विचारला पाहिजे.

सारनाथचे दगड बोलतात, द्वेष सोडा, करुणा स्वीकारा. अंधानुकरण सोडा, प्रज्ञेचा मार्ग स्वीकारा. विषमता सोडा, समतेचा मार्ग स्वीकारा आणि बाबासाहेबांचा विचार सांगतो शिका, संघटित व्हा, संघर्ष करा! या दोन्ही संदेशांची सांगड घातली, तरच सारनाथचा जागतिक वारसा दर्जा भारतासाठी खऱ्या अर्थाने ऐतिहासिक ठरेल. अन्यथा तो केवळ एका प्राचीन स्थळाला मिळालेला सन्मान ठरेल. सारनाथला मिळालेला हा सन्मान म्हणजे केवळ भारताच्या इतिहासाचा गौरव नाही तर तो बुद्धाच्या प्रज्ञेचा, धम्माच्या करुणेचा आणि समतेच्या मानवतावादी विचारांचा जागतिक विजय आहे. आता या वारशाचे जतन केवळ दगडांमध्ये नव्हे, तर आपल्या मनात आणि समाजाच्या आचरणात करणे हीच काळाची खरी मागणी आहे!

– प्रवीण बागडे

अण्णाभाऊ साठे : शब्दांना संघर्षाची धार देणारा लोकशाहीर!

महाराष्ट्राच्या मातीला संतांची, समाजसुधारकांची, विचारवंतांची आणि क्रांतिकारकांची मोठी परंपरा लाभली आहे. या परंपरेत अण्णाभाऊ साठे हे नाव केवळ एका साहित्यिकाचे नाही, तर ते उपेक्षितांच्या वेदनेला शब्द देणाऱ्या, शोषितांच्या संघर्षाला आवाज देणाऱ्या आणि अन्यायाविरुद्ध बंडाची मशाल पेटवणाऱ्या लोकशाहीराचे आहे. त्यांच्या लेखणीतून कागदावर उतरलेली माणसे काल्पनिक नव्हती तर ती आपल्या आजूबाजूला जगणारी, उपेक्षित, वंचित, कष्टकरी आणि संघर्ष करणारी माणसे होती. म्हणूनच अण्णाभाऊंचे साहित्य वाचताना आपण केवळ कथा वाचत नाही, तर एका समाजाचे अश्रू, आक्रोश, स्वप्ने आणि संघर्ष अनुभवतो. आज अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाईल. चौकाचौकात कमानी उभारल्या जातील, पुतळ्यांना हार घातले जातील, डीजेच्या तालावर घोषणा दिल्या जातील, सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव होईल. पण एक प्रश्न मात्र अस्वस्थ करणारा आहे, तो म्हणजे अण्णाभाऊंच्या विचारांचा खरा वारसा आपण किती जपला? अण्णाभाऊंची जयंती ही केवळ एका महामानवाच्या स्मरणाचा दिवस नाही तर ती समाजाच्या आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. त्यांच्या विचारांची खरी जयंती तेव्हाच साजरी होईल, जेव्हा समाजातील शेवटच्या माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी आपण उभे राहू. अन्याय, विषमता, जातीय भेदभाव, गरिबी आणि शोषणाविरुद्ध आवाज उठवू. अन्यथा जयंतीचे कार्यक्रम होतील, पण अण्णाभाऊंचा विचार मात्र उपेक्षितच राहील. अण्णाभाऊ साठे यांनी जगण्याच्या शाळेतून शिक्षण घेतले. त्यांच्या आयुष्यात गरिबी होती, संघर्ष होता, उपेक्षा होती. पण या परिस्थितीसमोर त्यांनी हार मानली नाही. त्यांनी आपल्या अनुभवांना साहित्याची ताकद दिली. 'फकिरा'सारख्या कादंबरीतून त्यांनी बंडखोर माणसाचे स्वप्न उभे केले. त्यांच्या साहित्याने समाजाच्या तळाशी असलेल्या माणसाला केंद्रस्थानी आणले. ज्यांना इतिहासाच्या पुस्तकांत जागा मिळाली नाही, ज्यांचा आवाज सत्तेच्या दालनापर्यंत पोहोचला नाही, ज्यांच्या कष्टावर समाजाची इमारत उभी राहिली, त्या माणसांना अण्णाभाऊंनी आपल्या लेखणीत अमर केले.

त्यांनी केवळ साहित्य निर्माण केले नाही, तर साहित्याची सामाजिक जबाबदारीही अधोरेखित केली. त्यांच्या लेखणीत मनोरंजन होते पण त्यापेक्षा म

ोठे वास्तव होते. त्यांच्या कथांमध्ये प्रेम होते, पण त्यापेक्षा मोठा संघर्ष होता. त्यांच्या पोवाड्यांत लय होती, पण त्या लयीच्या पाठीशी परिवर्तनाची हाक होती. आजच्या काळात अण्णाभाऊ साठे अधिक का आवश्यक आहेत, हा प्रश्न आपण स्वतःला विचारायला हवा. कारण आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा आपण अभिमान बाळगतो, पण दुसरीकडे अजूनही समाजातील मोठा वर्ग शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सन्मानाच्या मूलभूत हक्कांसाठी संघर्ष करीत आहे. शहरांच्या उंच इमारती आकाशाला भिडत आहेत, पण त्याच शहरांच्या सावलीत झोपडपट्ट्यांमध्ये हजारो कुटुंबे जगण्याची लढाई लढत आहेत. डिजिटल भारताची स्वप्ने दाखविली जात आहेत, पण अनेक मुलांच्या हातात अजूनही पुस्तकाऐवजी मजुरीची साधने आहेत. ही विषमता अण्णाभाऊंना मान्य झाली असती का?

आजही जातीय भेदभावाच्या घटना घडतात. आजही श्रम करणाऱ्याला सन्मान मिळत नाही. आजही गरीब माणसाचा आवाज अनेकदा व्यवस्थेच्या कानापर्यंत पोहोचत नाही. शिक्षण आणि नोकरीच्या संधींमध्ये असमानता आहे. शेतकरी, कामगार, स्थलांतरित, भटक्या-विमुक्त आणि वंचित समाजातील लाखो लोक आपल्या अस्तित्वासाठी झगडत आहेत. अशा वेळी अण्णाभाऊंची लेखणी आपल्याला प्रश्न विचारते की, 'ज्या माणसाच्या श्रमावर समाज उभा आहे, त्या माणसाला न्याय कधी मिळणार?' अण्णाभाऊंच्या विचारांचा गाभा हा माणूस होता. म्हणूनच त्यांचे साहित्य कोणत्याही एका जातीपुरते, समूहापुरते किंवा प्रदेशापुरते मर्यादित राहत नाही. त्यांचे साहित्य माणसाच्या स्वाभिमानाची भाषा बोलते. ते सांगते की, गरिबी ही माणसाची ओळख नसते आणि वंचित असणे हा त्याचा दोष नसतो. संधीपासून वंचित ठेवलेला माणूस जेव्हा संधी मिळते तेव्हा तो इतिहास बदलू शकतो. म्हणूनच अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्याला हार घालण्याबरोबरच त्यांच्या विचारांना आपल्या कृतीत उतरवण्याची गरज आहे. त्यांच्या नावाने मोठमोठे कार्यक्रम घेण्यापेक्षा एखाद्या गरीब विद्यार्थ्याच्या शिक्षणाची जबाबदारी घेणे अधिक अर्थपूर्ण ठरेल. त्यांच्या साहित्यावर चर्चा करण्याबरोबरच ते साहित्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे अधिक आवश्यक आहे. जयंतीच्या दिवशी घोषणाबाजी करण्यापेक्षा वर्षभर सामाजिक अन्यायाविरुद्ध उभे राहणे हीच खरी आदरांजली ठरेल. आज अण्णाभाऊंच्या नावाचा वापर करणाऱ्यांनीही आत्मपरीक्षण करायला हवे. अण्णाभाऊंच्या विचारांची मिरवणूक काढणे सोपे आहे, पण त्यांच्या विचारांनुसार जगणे कठीण आहे. त्यांच्या नावावर राजकारण करणे सोपे आहे, पण वंचितांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणे कठीण आहे. त्यांच्या पुतळ्याला हार घालणे सोपे आहे, पण त्यांच्या साहित्याचा आशय समजून घेणे आणि समाज बदलण्यासाठी कृती करणे कठीण आहे.

अण्णाभाऊंना खऱ्या अर्थाने अभिवादन करायचे असेल, तर समाजातील शेवटच्या माणसापर्यंत न्याय पोहोचविण्याची शपथ घ्यावी लागेल. शिक्षणाचा प्रकाश प्रत्येक घरापर्यंत पोहोचवावा लागेल. जात, धर्म, भाषा आणि प्रांताच्या भिंती ओलांडून माणुसकीचा सेतू बांधावा लागेल. ज्यांच्या हातात श्रम आहे, त्यांना सन्मान, ज्यांच्या डोळ्यात स्वप्न आहे, त्यांना संधी आणि ज्यांच्या आयुष्यात अन्याय आहे, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी समाज म्हणून उभे राहावे लागेल. अण्णाभाऊ साठे हे केवळ इतिहासातील एक पान नाहीत. ते वर्तमानाला अस्वस्थ करणारा प्रश्न आहेत. ते अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा आहेत. ते संघर्षातून निर्माण होणाऱ्या परिवर्तनाची शक्ती आहेत. त्यांच्या शब्दांना आजही धार आहे, कारण समाजातील विषमता अजून संपलेली नाही. त्यांची लेखणी आजही जिवंत आहे, कारण शोषितांच्या वेदना अजून संपलेल्या नाहीत. म्हणून या जयंतीदिनी अण्णाभाऊंच्या प्रतिमेला हार घालताना एक प्रश्न स्वतःला विचारूया, आपण अण्णाभाऊंचे भक्त आहोत की त्यांच्या विचारांचे वारसदार? कारण अण्णाभाऊंच्या जयंतीचा खरा अर्थ फटाके, मिरवणुका आणि घोषणांमध्ये नाही. तो आहे एखाद्या उपेक्षिताच्या आयुष्यात आशेचा दिवा पेटवण्यात. तर तो आहे अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यात. तो आहे शिक्षणासाठी संघर्ष करण्यात. तो आहे माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देण्यात आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, अण्णाभाऊंच्या नावाचा जयघोष करण्यापेक्षा त्यांच्या विचारांचा जागर करण्यामध्येच त्यांच्या जयंतीचे खरे सार्थक आहे! अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

– प्रवीण बागडे

'बटवारा १९४७'चा दमदार ट्रेलर प्रदर्शित; फाळणीच्या वेदनांतून उजळली मानवतेची हृदयस्पर्शी कहाणी

आमिर खान प्रॉडक्शन्सचा बहुप्रतीक्षित चित्रपट 'बटवारा १९४७', दिग्दर्शक राजकुमार संतोषी यांच्या दिग्दर्शनाखाली आणि शबाना आझमी, सनी देओल व प्रीती जी झिंटा यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट, १४ ऑगस्ट २०२६ रोजी 'विभाजन दिना'च्या निमित्ताने जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

आमिर खान प्रॉडक्शन्सचा 'बटवारा १९४७' हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक बहुप्रतीक्षित चित्रपटांपैकी एक आहे. यापूर्वी प्रदर्शित झालेल्या प्रभावी पोस्टर्स आणि गाजलेल्या टीझर्समुळे या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. या झलकांनी संघर्ष, जगण्यासाठीची धडपड आणि मानवी आत्म्याच्या अदम्य शक्तीची भव्य कहाणी पाहायला मिळणार असल्याची चाहूल दिली होती. आता, बहुप्रतीक्षित ट्रेलर प्रदर्शित झाला असून, तो भारतीय उपखंडाच्या इतिहासातील सर्वात वेदनादायी अध्यायांपैकी एका घटनेची हृदयस्पर्शी झलक दाखवतो.

हा ट्रेलर या अविस्मरणीय गाथेची भावनिक आणि भव्य सिनेमॅटिक व्याप्ती प्रभावीपणे उलगडतो.

१९४७ च्या भारताच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर आधारित 'बटवारा १९४७' ही एका कुटुंबाची कथा आहे, ज्यांचे आयुष्य हिंसा, भीती आणि सत्तीच्या स्थलांतरामुळे पूर्णपणे बदलून जाते. एकेकाळी एकत्र राहणारे समाज विभाजनाच्या जखमांनी तुटून जातात. मात्र, अमर्याद दुःख आणि वाढत्या वैमनस्याच्या काळातही हा चित्रपट द्वेषापेक्षा माणुसकी, निराशेपेक्षा आशा आणि सूडापेक्षा करुणा निवडण्याचे धैर्य साजरे करतो.

सनी देओल एका अशा व्यक्तीची दमदार भूमिका साकारताना दिसतात, जो कोणत्याही परिस्थितीत आपल्या विवेकाशी तडजोड करत नाही. शबाना आझमी एका ज्येष्ठ महिलेच्या भूमिकेत विलक्षण प्रभाव पाडतात, जिचे शहाणपण, संयम आणि करुणा या चित्रपटाचा नैतिक आधार बनतात. प्रीती जी झिंटा एका अशा महिलेची भूमिका साकारतात जी अत्यंत कठीण परिस्थितीतही आपल्या कुटुंबाला एकत्र ठेवण्यासाठी संघर्ष करते. त्यांच्या भूमिकेत ऊब, जिद्द आणि भावनिक खोली अनुभवायला मिळते.

भव्य प्रमाण, सशक्त भावना आणि नेत्रदीपक दृश्यांनी समृद्ध असलेला हा ट्रेलर फाळणीची शोकांतिका आणि सामान्य माणसांमधील असामान्य मानवतेची ताकद दोन्ही प्रभावीपणे मांडतो. शबाना आझमी, सनी देओल, प्रीती जी झिंटा आणि संपूर्ण कलाकारांच्या उत्कृष्ट अभिनयामुळे बटवारा १९४७' हा केवळ इतिहास सांगणारा चित्रपट नसून, प्रेक्षकांच्या मनाला भिडणारा आणि दीर्घकाळ स्मरणात राहणारा सिनेमॅटिक अनुभव ठरणार आहे.

'बटवारा १९४७' मध्ये शबाना आझमी, सनी देओल, प्रीती जी झिंटा, करण देओल, अली फझल आणि अभिमन्यू सिंग यांचा दमदार कलाकारांचा संच आहे. जवळपास तीन दशकांनंतर दिग्दर्शक राजकुमार संतोषी आणि सनी देओल पुन्हा एकत्र येत असल्याने या चित्रपटाविषयीची उत्सुकता आणखी वाढली आहे.

आमिर खान प्रॉडक्शन्सच्या बॅनरखाली निर्मित 'बटवारा १९४७' चे दिग्दर्शन राजकुमार संतोषी यांनी केले आहे. चित्रपटाला ए. आर. रहमान यांनी संगीत दिले असून गीतकार जावेद अख्तर यांनी गीतलेखन केले आहे.

आमिर खान आणि अपर्णा पुरोहित यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून, हा चित्रपट १४ ऑगस्ट २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

ब्रह्ममुहूर्तावर बहुप्रतिक्षित 'रामायण' चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च; रणबीर प्रभू श्रीराम, तर यश रावणाच्या भूमिकेत, दिवाळीत होणार प्रदर्शित

हिंदुस्थानी चित्रपटसृष्टीतील अत्यंत बहुप्रतीक्षित 'रामायण' या भव्य चित्रपटाचा पहिला ट्रेलर अखेर ३० जुलै रोजी ब्रह्ममुहूर्तावर पाच हिंदुस्थानी भाषांमध्ये प्रदर्शित झाला आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित आणि दोन भागांत बनत असलेल्या या चित्रपटाच्या पहिल्या भागाचा ट्रेलर प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत असून, यात प्रभू राम आणि रावण यांच्यातील महायुद्धाची भव्य झलक पाहायला मिळते. यात रणबीर कपूर शांत आणि प्रभावी प्रभू रामाच्या भूमिकेत तर यश आक्रमक आणि दरारा निर्माण करणाऱ्या रावणाने भूमिकेत दिसत आहे.

नमित मल्होत्राच्या प्राईम फोकस स्टुडिओ, डीएनईजी आणि यशच्या मॉन्स्टर माइंड क्रिएशन्सच्या सहकार्याने निर्मित हा चित्रपट २०२६ च्या दिवाळीत जगभरात प्रदर्शित होणार असून, याचे जागतिक वितरण सोनी पिक्चर्स टेलिव्हिजन आणि उत्तर हिंदुस्थानातील वितरण धर्मा प्रॉडक्शन्स करणार आहे. ४ मिनिटे ९ सेकंदांच्या या ट्रेलरची सुरुवात यशने साकारलेल्या रावणाच्या फकिराच्या वेशात राजवाड्यात प्रवेश करण्यापासून होते. रक्षक ओळख विचारल्यावर तो स्वतःला 'तुमचा नवीन राजा' असे म्हणतो आणि त्यानंतर देवलोक, पृथ्वीलोक आणि पाताळलोकवर फक्त रावणराज असण्याची घोषणा करतो. संपूर्ण ट्रेलरमध्ये यशचा रावणाच्या भूमिकेतील राग, प्रभावी वावर आणि अभिनय विशेष उठून दिसतो. रणबीर कपूर प्रभू रामाच्या भूमिकेत शांत आणि प्रभावी वाटत असून, तो महाकाय प्राणी व राक्षसांशी लढताना दिसतो. साई पल्लवीने सीतेची आणि लारा दत्ताने कैकेयीची भूमिका साकारली आहे. याशिवाय रवी दुबे लक्ष्मणाच्या भूमिकेत, राकुल प्रीत शूर्पणखेच्या भूमिकेत आणि अरुण गोविल राजा दशरथाच्या भूमिकेत दिसत आहेत. लक्ष्मणाने शूर्पणखेचे नाक कापल्याचे दृश्यही ट्रेलरमध्ये आहे. मात्र, या चित्रपटात हनुमानाची भूमिका साकारणाऱ्या सनी देओलची कोणतीही झलक या लांबलचक ट्रेलरमध्ये दाखवण्यात आलेली नाही.

कर्जमुक्ती योजनेतून ९४ हजार शेतकरी अपात्र

आयकरदाते असल्याने कारवाई; राज्य सरकारचे १ हजार ८८१ कोटी रुपये वाचले

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) – राज्य सरकारच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत सहकार विभागाने केलेल्या डेटा पडताळणीत ९४ हजार ८३ शेतकरी आयकरदाते असल्याचे उघड झाले आहे. या आयकरदात्या शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेतून अपात्र ठरवण्यात आले असून, या निर्णयामुळे राज्य सरकारच्या तिजोरीतील १ हजार ८८१ कोटी ६६ लाख रुपयांची बचत झाली आहे.

सहकार विभागाने या योजनेअंतर्गत आतापर्यंत ३१ लाख ६४ हजार २८ शेतकऱ्यांच्या माहितीची सखोल पडताळणी केली. योजना जाहीर करतानाच आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ दिला जाणार नाही, तसेच केंद्र सरकारकडून अशा करदात्यांची माहिती मागवली जाईल, असे शासनाने स्पष्ट केले होते. त्या निकषांच्या आधारे ही अपात्रतेची कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात लाभाची रक्कम हस्तांतरित करण्यासाठी शासनाने ७ हजार कोटी रुपयांच्या निधी वितरणास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

या योजनेसाठी राज्य सरकारने ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद केली असून, त्याद्वारे सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यापैकी ३२ लाख शेतकरी हे थकबाकीदार गटातील आहेत. तर, वेळेवर आणि नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या २४ लाख शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र ठरवण्यात आले आहे. तसेच २ लाख ९० हजार शेतकऱ्यांकडे २ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असून, त्यांना २ लाखांवरील अतिरिक्त रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

पाच दिवसांत रक्कम खात्यात जमा होणार

डेटा पडताळणीत ९४ हजारांहून अधिक शेतकरी आयकरदाते निष्पन्न झाल्याने तिजोरीवरील मोठा आर्थिक ताण टळला आहे. पहिल्या यादीतील शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण होताच पुढील ५ दिवसांत लाभाची रक्कम त्यांच्या कर्ज खात्यात जमा केली जाईल. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी लवकरात लवकर आधार प्रमाणीकरण पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन सहकार विभागातर्फे करण्यात आले आहे.

वारकरी संप्रदाय आणि हिंदु धर्म यांच्यात फूट पाडण्याचे कटकारस्थान करणाऱ्यांच्या विरोधात संघटित होण्याचा निर्धार !

पंढरपूर – वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राचा कणा असून महाराष्ट्र जोडण्याची शक्ती या संप्रदायात आहे. काही निधर्मी, डावे, पुरोगामी त्याला खिळखिळा करण्याचा प्रयत्न करत आहेत. वारकरी संप्रदाय हा सर्वसमावेशक असून त्याने वेळोवेळी समाजाला दिशा देण्याचे काम केले आहे. धर्मनिष्ठ अशा वारकरी संप्रदायात वारकरी आणि हिंदु धर्म वेगळा असा भासवण्याचे षडयंत्र चालू आहे. वारकरी संप्रदाय आणि हिंदु धर्म यांच्यात फूट पाडण्याचे कटकारस्थान करणार्यांच्या विरोधात संघटित होण्याचा निर्धार वारकरी महाअधिवेशनात करण्यात आला. वारकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी सद्गुरु श्री गंगागिरी महाराज मठ येथे २५ जुलैला वारकरी महाअधिवेशन आयोजित केले होते. त्या अधिवेशनात हा निर्धार व्यक्त करण्यात आला. 'श्री क्षेत्र गोदावरी धाम बेट सरला'चे महंत गुरुवर्य प.पू. रामगिरी महाराज यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशनासाठी १००० पेक्षा अधिक वारकरी भाविक उपस्थित होते. सूत्रसंचालन हिंदु जनजागृती समितीचे श्री. धनंजय बोकडे यांनी केले, तर श्री. विनोद रसाळ यांनी अधिवेशनाचा उद्देश स्पष्ट केला.

या अधिवेशनात वारकरी संप्रदायातील हिंदुत्वासाठी कार्य करणारे ह.भ.प. आणि पूजनीय संत यांना 'घुसखोर' संबोधून त्यांचा अवमान करणार्या तथाकथित पुरोगार्यांचा जाहीर निषेध करण्यात आला, तसेच हिंदुत्वनिष्ठ, संत यांचा ज्ञानेश्वर माऊलींची मूर्ती देऊन जाहीर सन्मान करण्यात आला. संत सोपानकाका सहकारी बँकेचे अध्यक्ष, भाजप महाराष्ट्र प्रदेश सचिव माजी आमदार संजय जगताप यांनी २० ज्ञानेश्वर माऊलींच्या मूर्ती उपस्थितांना भेट देण्यासाठी अर्पण म्हणून दिल्या. या प्रसंगी इंचगिरी मठाचे मठाधिपती सुदर्शन महाराज, राष्ट्रीय वारकरी परिषदेचे ह.भ.प. रामदास महाराज चौधरी, ह.भ.प. दत्तात्रय चोरगे महाराज यांसह विविध मान्यवर उपस्थित होते.

विशेष सन्मान – हुपरी (कोल्हापूर) येथे निवेदन, तसेच विविध मार्गाने आंदोलन करून अवैध मदरसा तोडण्यास भाग पाडणारे श्री. नितीन काकडे, पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणीदेवी मंदिरातील श्री विठ्ठलाच्या मूर्तीच्या रासायनिक लेपनाच्या विरोधात न्यायालयीन लढा देणारे श्री. गणेश लंके, गोरक्षणाच्या कामात सातत्याने काम करणारे राष्ट्रीय वारकरी सेनेचे उपाध्यक्ष ह.भ.प अंभोरे महाराज कारभारी यांचा संत ज्ञानेश्वर माऊलींची मूर्ती देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

हिंदूंनी इतिहासबोध, शत्रूबोध लक्षात घेऊन हिंदु धर्मावर होणाऱ्या आघातांच्या विरोधात कृतीशील होणे आश्यक ! – प.पू. रामगिरी महाराज

हिंदू इतिहासातून शिकत नाहीत आणि आपण संघटित नाही त्यामुळेच अनेक आक्रमकांनी आपल्यावर राज्य केले. धर्मावर होर्णाया आघातांविषयी आपण जागृत नसल्याने आज अन्य धर्मिय आणि चुकीचे विचार पसरवण्याचे फावते आहे. वारकरी संप्रदाय हा जगाला देण्याचे, जोडण्याचे काम काम करतो अशा वारकरी संप्रदायाविषयी आज भ्रमित करणारे विचार पसरवले जात आहेत, 'समता' दिंडी काढली जात आहे. आज काही जण पंढरपूरचा पांडुरंग हा विठ्ठल नसून अन्य कुणी असल्याचे सांगत आहे. जगात धर्म एकच असून तो म्हणजे सनातन धर्म आहे. लोकांना आज हिंदु धर्माचे महत्त्व न समजल्याने ते अन्य धर्मात जात आहेत. 'लव्ह जिहाद'चे लोण आता प्रत्येक खेड्यापाड्यापर्यंत पोचले आहे. लहान मुलांनाचही बुद्धीभेद करून त्यांना इस्लामच्या प्रार्थना शिकवल्या जात आहेत. गोवंश रक्षणाच्या संदर्भात सरकारने मे महिन्यात एक अध्यादेश काढला असून जर एखाद्या परिसरात अवैधरितीने गोहत्या झाल्यास त्याला पोलीस, तहसीलदार, प्रशासन तितकेच उत्तरदायी आहेत ! हे लक्षात घेऊन आपण प्रशासनास गोहत्या थांबवण्यासाठी भाग पाडले पाहिजे.''

वारकरी संप्रदायात घुसलेले खरे घुसखोर कोण ही सांगण्याची आता वेळ आली आहे ! – सुनील घनवट, महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक, हिंदु जनजागृती समिती

संघटित असलेल्या वारकरी संप्रदायात हेतूपुरस्सर दुफळी पाडण्याचे त्यांचा जाणीवपूर्वक बुद्धीभेद करण्याचे काम चालू आहे. श्री विठ्ठलाची भक्तीचे वर्णन करणारे जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे अनेक अभंग असतांना जाणीवपूर्वक 'अल्लाशिवाय कुणी श्रेष्ठ नाही', 'अल्ला दिलावे-अल्ला खिलावे', अशा प्रकारची केवळ एकांगी प्रसार करणारे फलक वारीच्या वाटेवर लावले जात आहेत. हे षड्यंत्र आपण वेळीच ओळखून हे हाणून पाडले पाहिजे. वारकरी संप्रदायात वारकरी संप्रदायात घुसलेले खरे घुसखोर कोण आहेत हे सांगण्याची आता वेळ आली आहे. महाराष्ट्रासाठी वारकरी संप्रदाय प्राण असून हिंदु धर्म आत्मा आहे ! देहलीतील कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनात 'पेपरफुटीच्या विरोधात चालू असलेल्या आंदोलनाच्या नावाखाली पोलिसांच्या गाड्या फोडण्यात आल्या, पोलिसांवर आक्रमण करण्यात आले. तिथे दंगलसदृष्य परिस्थिती होती. यात देशविरोधी घोषणा देण्यात आल्या. हे देशविरोधी षडयंत्र आपण लक्षात घेऊन त्याविरोधात कृती करण्याचा निर्धार केला पाहिजे.''

विहिपचे ह.भ.प. नारायण महाराज शिंदे म्हणाले, ''वारकऱ्यांच्या भोळेपणाला लाभ घेऊन काही लोक त्यांना निरनिराळ्या प्रकारची अमिषे दाखवून त्यांचा बुद्धीभेद करण्याचा प्रयत्न करतात. तरी यापुढील काळात वारकरी संप्रदायात घुसलेले कीर्तनकार शोधून काढून त्यांना समोर आणणे आवश्यक आहे!'' राष्ट्रीय वारकरी परिषदेचे प्रवक्ते ह.भ.म. महेंद्र महाराज म्हस्के म्हणाले, ''सध्या देव, देश, धर्म यांच्यापुढे अनेक मोठी आव्हाने आहेत. संप्रदायासाठी काम करणारे अनेक लोक धर्माच्या व्यासपीठावर येऊन त्यांचे मत व्यक्त करण्यास घाबरतात; मात्र प.पू. वक्ते महाराज यांनी सांगितल्याप्रमाणे अगोदर आपण वैदिक सनातन हिंदू आहोत मग वारकरी आहोत', हे नेहमी लक्षात ठेवावे लागेल. राष्ट्रीय वारकरी परिषदेचे प्रवक्ता ह.भ.प. निवृत्ती महाराज हल्ल्याळीकर म्हणाले, ''महाराष्ट्र सरकारने गोवंश हत्याबंदी कायदा लागू केला; मात्र हा कायदा कठोर केला पाहिजे. सर्व तीर्थक्षेत्रे मद्यमांस मुक्त केली पाहिजेत. इंद्रायणी, चंद्रभागा या नद्या स्वच्छ झाल्या पाहिजेत.''

विश्व हिंदु परिषदेचे केंद्रीय सहमंत्री श्री. दादा वेदक म्हणाले, ''देव, देश, धर्म यांवर होर्णाया आघातांच्या विरोधात वारकर्यांनी आवाज उठवला पाहिजेत. वारकरी संप्रदायाची, भक्ती, समर्पण, त्याग कुठेही अल्प होता कामा नये ! वारकरी संप्रदाय समाजमूल्य जतन करण्यासाठी सतत प्रयत्न करत आहे. सध्या कुटुंबसंस्था, विवाहसंस्था यावर घाला घालण्याचे काम चालू असून समाज आणि राष्ट्र यांना जोडणारा दुवा कुटुंबव्यवस्था आदर्श म्हणून उभा केला पाहिजे. हिंदू कुटुंबाने त्यांचा एकतरी मुलगा धर्माच्या कामासाठी दिला पाहिजे !

राष्ट्रीय वारकरी परिषदेचे अध्यक्ष ह.भ.प. मारुति महाराज तुनतुने-शास्त्री म्हणाले, ''अन्य धर्मिय संघटित असल्याने त्यांचा प्रत्येक मागण्यांची नोंद शासनाला घ्यावी लागते, तर हिंदू संघटित नसल्याने आज हिंदु धर्मावर आघात होत आहेत. गोमातेला राजमातेचा दर्जा असतांना पशूवधगृहाची अनुमती दिली जाते, देदुर्दैवी आहे.'' प्रज्ञापुरी ज्ञानपीठ अक्कलकोटचे पीठासीन धर्माधिकारी श्री. प्रसाद पंडित म्हणाले, ''वज्रलेपनच्या संदर्भात फोलपणा माहिती असूनही जाणीवपूर्वक मंदिर समितीने वज्रलेप करण्याचा अट्टाहास केला. याला मंदिर महासंघासह वारकरी संप्रदायाने पत्रकार परिषद घेऊन यातील फोलपणा समोर आणला, तसेच न्यायालयीन लढाईद्वारे याला स्थगिती मिळवली.''

विविध ठरावांचा 'हर हर महादेव'च्या गजरात पाठिंबा !

पंढरपूर येथील पुरातत्व विभागाच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील रासायनिक लेपन प्रक्रिया या धर्मविरोधी निर्णयाच्या विरोधात वारकरी आणि मंदिर महासंघ यांनी लढा दिला आणि यापुढील काळात कोणत्याही प्रकारची रासायनिक लेपन प्रक्रिया करू नये, संत, संत-वांयय, राष्ट्रपुरुष, धर्म, देवता आदींचा अवमान करणार्यांवर कठोर कारवाई होण्यासाठी ईशनिंदा प्रतिबंधक कायदा लागू करावा, प्रस्तावित 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम २०२६' स्थगित असून यापुढे सरकारने देवभूमीचे रक्षण करणारा 'देवस्थान भूमी संरक्षण कायदा' लागू करावा यांसह करण्यात आलेल्या विविध ठरावांना वारकरी-भाविक यांनी 'हर हर महादेव'च्या गजरात पाठिंबा दिला.

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराच्या माध्यमातून नागरिकांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा-पालकमंत्री संजय शिरसाट

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान; दि.२६ जुलै ते २ ऑगस्ट पर्यंत जिल्ह्यात आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील नागरिकांचे महसूल विषयक प्रश्न गतीने सोडविणे आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे ही शासनाची भूमिका असून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्याछत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून सर्व पात्र लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज येथे केले.

सूर्या लॉन्स, बीड बायपास येथे आयोजित जिल्हास्तरीय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी इतर बहुजन कल्याण, दुग्ध विकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभागात मंत्री अतुल सावे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. , निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते,उपविभागीय अधिकारी व्यंकट राठोड, तहसीलदार शिवानंद बिडवे यांच्या सह विविध विभागाचे अधिकारी, अभियानाअंतर्गत सेवेचा लाभ घेतलेले लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री म्हणाले की, नागरिकांना एकाच छताखाली अनेक सुविधा उपलब्ध करून देण्याचा शासनाचा उद्देश असून, मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून राज्यभरात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाची संकल्पना राबवली जात आहे. जिल्ह्यात २६ जुलै २०२६ ते दि.०२ ऑगस्ट, २०२६ या कालावधीत मतदारसंघ निहाय हे अभियान राबविले जात आहे. नागरिकांसाठी असलेल्या विविध योजनांचा लाभ त्यांना वेळ पोहोचत नव्हता मात्र या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना एकाच छताखाली विविध योजनांचा लाभ देणे शक्य झाले आहे. यापुढेही नागरिकांना असेच लाभ एकाच ठिकाणी मिळावेत, नागरिकांमध्ये या अभियानाबाबत जनजागृती करण्याबाबत प्रशासनाने प्रयत्न करण्याचे निर्देश यावेळी दिले.

श्री. सावे म्हणाले, शासनाने विविध योजनांचा लाभ सर्व लाभार्थ्यांना देण्याची सुविधा महसूल विभागाने केली आहे. शेवटच्या घटकांपर्यंत पारदर्शकपणे लाभ मिळाला पाहिजे ही शासनाची भूमिका असून ज्यांना अजून पर्यंत लाभ मिळाला नाही त्यांनी या शिबिराच्या माध्यमातून लाभ घेण्याचे आवाहन यावेळी केले.

जी. श्रीकांत म्हणाले, नागरिकांना शासकीय कामासाठी शासकीय कार्यालयात वारंवार हेलपाटे मारावे लागू नये, नागरिकांना त्यांच्या हक्काच्या गोष्टी मिळाल्या पाहिजे. यासाठी या अभियानाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासनप्रमाणे काम करायचे आहे. नागरिकांनाही त्यांच्या अडचणी अथवा तक्रारी असल्यास आपले सरकार यासारख्या पोर्टलवर तक्रार करून आपल्या शंकांचे निरसन करता येणार आहे.

जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकाच. छताखाली देण्याचे शासनाचे धोरण असून ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी न्याय, पारदर्शकता केंद्रस्थानी ठेवून सक्षम महसूल व्यवस्था उभारली त्याप्रमाणे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्यासाठी महसूल विभाग काम करीत

असल्याचे यावेळी सांगतले. तसेच या अभिनयाच्या माध्यमातून एकाच ठिकाणी एकाच दिवशी' सेवा देण्याची संकल्पना या मोहिमेतून प्रत्यक्ष राबविण्यात येत असून सातबारा, फेरफार, वारस नोंद, उत्पन्न, रहिवासी दाखले, जमीनविषयक नोंदीतील दुरुस्त्या, प्रलंबित अर्जांचा पाठपुरावा तसेच महसूल संदर्भातील इतर प्रशासकीय बाबींचे तात्काळ निवारण करण्यावर विशेष भर असल्याचेही सांगितले.

यावेळी महसूल दिनाच्या उपस्थित मान्यवरांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. तसेच मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. अभियानाची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवून लोकांना लाभ देण्याबाबत उपाययोजना व व्यवस्थेसाठी लोकहिताच्या योजनांचे स्टॉल्स ही अभियान स्थळी लावण्यात आले होते.

०३ ऑगस्ट रोजी महानगरपालिका लोकशाही दिन

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिका स्तरावरील लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी राबविण्यात येतो.

माहे ऑगस्ट २०२६ चा महानगरपालिका लोकशाही दिन सोमवार दि.०३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता प्रशासकीय समिती कक्ष ,मनपा मुख्यालय येथे मां.आयुक्त यांचे अध्यक्षते खाली आयोजीत करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून दिलेल्या सुधारित परिपत्रकानुसार लोकशाही दिनाच्या १५ दिवस अगोदर विहित नमुन्यात आवश्यक कागद पत्रासह अर्ज दिलेल्या नागरिकांनाच दि.०३ ऑगस्ट २०२६ रोजी समक्ष अर्ज सादर करण्याची परवानगी राहील ,याची नोंद घ्यावी.

ज्यांनी या पूर्वीच्या महानगरपालिका लोकशाही दिनात तक्रार अर्ज दिलेले असतील परंतु त्याच प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही अशा प्रकरणात त्यांनी पुन्हा अर्ज देण्याची आवश्यकता नाही असे अतिरिक्त आयुक्त ०२ कल्पिता पिंपळे छत्रपती संभाजीनगर पालिका यांनी कळविले आहे.

विरोधीपक्षनेत्यासह एमआयएमचे १६ नगरसेवकांचे पद धोक्यात, सत्ताधारी भाजपचे ७ नगरसेवकांचा समावेश

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- महानगरपालिका सार्वजनिक निवडणूक-२०२६ मध्ये निवडून आलेल्या काही नगरसेवकांविरोधात बेकायदेशीर बांधकाम, तिसरे अपत्य तसेच इतर अपात्रतेच्या कारणांवरून दाखल झालेल्या तक्रारींची दखल घेत महापालिका प्रशासनाने एकूण २३ नगरसेवकांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. यामध्ये विरोधी पक्ष नेत्यासह एमआयएमच्या १६ नगरसेवकांसह सत्ताधारी भाजपच्या ७ नगरसेवकांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.

महापालिका प्रशासनाने संबंधित तक्रारींची प्राथमिक पडताळणी करून नोटिसा बजावल्या असून, संबंधित नगरसेवकांना

आपली बाजू मांडण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. समाधानकारक उत्तर न मिळाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या नगरसेवकांच्या पदाबाबत राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

दरम्यान, या प्रकरणावर एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शारेक नक्शबंदी यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, ''एमआयएमच्या काही नगरसेवकांना अद्याप नोटीस प्राप्त झालेली नाही. नोटीस मिळाल्यानंतर पक्षाचे वरिष्ठ नेते कायदेतज्ज्ञांच्या सल्ल्याने योग्य उत्तर सादर केले जाईल. पक्ष कायदेशीर मार्गाने आपली बाजू भक्कमपणे मांडेल. नागरिकांनी कोणतीही चिंता करण्याचे कारण नाही. एमआयएम शहराच्या विकासासाठी कटिबद्ध असून आमचे सर्व नगरसेवक जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करत आहेत.'' महापालिका प्रशासनाच्या पुढील सुनावणी व निर्णयाकडे आता संबंधित नगरसेवकांसह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

विष्णुनगर जैन मंदिरात प्रथमच सिद्धचक्र विधान उत्साहात

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- श्री १००८ चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर विष्णुनगर येथे अष्टानी का पर्व निमित्त आयोजित सिद्धचक्र विधानास महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमात याप्रसंगी सविता घोडके, वैशाली धोंगडे ,सविता खुळे ,ज्योती खुळे, चंदाबाई गवळी, माधुरी गवळी ,सुनीता गोसावी, कल्पना जैन, लताबाई क्षीरसागर, लिलाबाई धोंगडे ,वंदना गवळी ,प्रणिता वायकोस ,सुरेखा बाई घोडके, कल्पना बाई बुजुर्गे, अनिता वायकोस ,कल्पना खुळे आदी महिला सक्रिय भक्ती भावाने सहभाग नोंदवून पूजन केले. सकाळी भगवंताचा अभिषेक शांति मंत्र व सिद्ध चक्र विधान . संगीतमय विधान पूजन पंडित रामदास चतुर यांच्या संगीत ध्वनीने संपन्न करण्यात येत आहे विधान यशस्वी करण्यासाठी मंदिर अध्यक्ष बाहुबली वायकोस, सचिन शिरसागर, जयकुमार वायकोस ,शुभम घोडके, सुभाष क्षीरसागर, रमेश काळे आधी परिश्रम घेत आहे. अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यांनी दिली.

वैजापूरात सकल मातंग समाजाच्या वतीने लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

वैजापूर दि.१ (प्रतिनिधी)- ही पृथ्वी शेषणनागाच्या शिरावर तरलेली नसून, ती कामकरी, कष्टकरी यांच्यावर तरलेली असते असे ठासून जगाला सांगणारे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती येथील सकल मातंग समाजाच्या वतीने शनिवार (०१) रोजी त्यांच्या पुतळ्याला शहरातील सर्व थरातील नागरिकांनी एकत्र येऊन सामुदायिक रित्या पुष्पहार अर्पण करून अण्णाभाऊ साठेंना अभिवादन केले.

सर्वप्रथम आमदार प्रा. रमेश पाटील बोरनारे, नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, उपनगराध्यक्ष रियाज शेख, रामहरी बापू सळुंके, शिवसेना शहर प्रमुख राजेंद्र पा.साळुंके, अखिल शेख, नगरसेवक विशाल संचेती, पारस घाटे, शिक्षण सभापती बाबासाहेब पुतळे, आमिरअली, राहुल त्रिभुवन, राजेश गायकवाड, श्रीमती ज्योतीताई जोशी, संजय बोरनारे, प्रशांत कंगले, प्रकाश चव्हाण, तसेच माजी नगरसेवक गणेश खैरे, शैलेंद्र चव्हाण, वसंत त्रिभुवन, ज्ञानेश्वर टेके, सचिन राजपूत, अमोल बोरनारे तसेच डॉ.राजीव डोंगरे, डॉ. बी.बी.शिंदे, श्रीकांत साळुंके,या शिवाय शिव-फुले-शाहू-आंबेडकर विचार मंच सदस्य, सकल मातंग समाज व उत्सव समिती कार्यकर्ते यांच्या सह शहरातील सर्व थरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्र संचलन सामाजिक कार्यकर्ते ठा.धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. आभार राहुल त्रिभुवन यांनी मानले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त अभिवादन

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या वतीने आज सकाळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निम्मित अभिवादन करण्यात आले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथे मां. महापौर श्री समीर राजूरकर यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सभापती स्थायी समिती अनिल मकरिये, नगरसेविका कीर्ती शिंदे, माधुरी अदवंत, प्रभाग समिती ०१ सभापती करुणा जाधव, आयुक्त अमोल येडगे, माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद, रविंद्र खरात, अतुल बनकर, संतोष कोठाळे, करण साळवे, इंजमाम उल हक आदींची उपस्थिती होती.

(पान १ वरून)

पुण्यात अमित शाहांच्या हस्ते...

केली. हा देश जेव्हा स्वतंत्र होईल तेव्हा, याच मार्गाने पुढे जाईल, हे त्यांनी तेव्हा ठरवले होते आणि आज तेच सुरू आहे.

मला लोकमान्य टिळकांचा गीतारहस्य हा ग्रंथ गुजरातीत मिळाला. माझे तरुणांना आवाहन आहे. तुम्ही टिळकांची गीता वाचा. तुमच्या आयुष्यात तुम्ही कधीच चूक करणार नाही. मी गॅरंटी देतो. हा ग्रंथ भगवद्गीतेचे व्यावहारिक स्वरूप आहे. सामान्य माणूस भगवतगीता कशी जगू शकतो. त्याचे व्यवहारीक स्वरुप त्यात आहे, असा सल्ला अमित शाह यांनी तरुणांना दिला आहे.

अमित शहा म्हणाले, भगवद्गीतेला कसे जगू शकतो हे टिळकांनी दाखवून दिले आहे. त्यांनी शैक्षणिक व्यवस्था पुण्यात केली आणि त्यांनी बुद्धीला ज्ञान देणे हे शिक्षणाचे काम आहे, हा मंत्र दिला. इंग्रज जर कोणत्या वृत्तपत्राला घाबरत असतील तर ते केसरी आणि मराठाला घाबरत होते. टिळकांनी राष्ट्रच्या चेतनेला जागवूनच स्वतंत्रता मिळवली पाहिजे, असे म्हटले होते.

पुढे बोलताना अमित शहा म्हणाले, आत्मनिर्भरता देखील स्वराज्याचा भाग आहे हे टिळकांनी दाखवून दिले होते. त्यांचे जीवन हे आजच्या युवकांना प्रेरणास्त्रोत आहे. टिळकांची लेखनी कधी जुनी नाही होणार

सर्वोच्च न्यायालय धनुष्यबाण...

२०२९ सालच्या लोकसभा-विधानसभेच्या तयारीला लागा असे आदेश उद्धव ठाकरे यांनी दिले. पक्षबांधणीवर भर देऊन जास्तीत जास्त कार्यकर्ते जोडण्याच्या सूचना ठाकरेंनी दिल्या. आगामी ग्रामपंचायत निवडणुकांवर विशेष लक्ष केंद्रीत करण्याचे निर्देश ठाकरेंनी पदाधिकाऱ्यांना दिले.

दरम्यान, ८ ऑगस्टपर्यंत नोंदणी मोहीम प्रभावीपणे राबवण्यात याव्यात. त्यासाठी आपापल्या विभागात आणि जिल्ह्यात नागरिकांची नोंदणी पूर्ण करण्याचे निर्देश पदाधिकाऱ्यांना देण्यात आले. एसआयआर प्रक्रियेतून एकाही पात्र व्यक्तीचे नाव वगळले जाणार नाही, याची काळजी घेण्याच्या सूचना उद्धव ठाकरेंनी दिल्या.

'लाडक्या बहिणीं'नंतर आता...

असले, तरी त्या दाव्यांच्या गणनेत गंभीर त्रुटी असल्याचे परिवहन विभागाच्या निदर्शनास आल्याचे सांगण्यात आले. विविध प्रवर्गांना दिलेल्या तिकीट सवलतींची प्रतिपूर्ती कोणत्या निकषांवर निश्चित केली जाते, याबाबत समाधानकारक माहिती महामंडळाकडून सादर केली नसल्याने शासनाकडे पाठविल्या जाणाऱ्या मागण्यांच्या अचूकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. वित्त विभागाने यापूर्वीही या त्रुटींकडे लक्ष वेधत प्रतिपूर्तीची रक्कम प्रमाणित केल्यानंतरच शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार महामंडळाच्या लेखा व कोषागार विभागामार्फत सवलत प्रतिपूर्तीच्या दाव्यांचे लेखापरीक्षण अनिवार्य करण्यात आले आहे. मात्र, तीन महिन्यांपूर्वी सूचना देऊनही लेखापरीक्षण पूर्ण झाले नसल्याचे बैठकीत स्पष्ट झाले. त्यामुळे यापुढे लेखापरीक्षण अहवालासहच सवलत मूल्य प्रतिपूर्तीची मागणी सादर करावी आणि दाव्यांमध्ये पारदर्शकता व अचूकता राखावी, असे स्पष्ट निर्देश परिवहन विभागाने दिले. याशिवाय, शासनाकडून विविध सवलत योजनांची प्रतिपूर्ती वेळेत आणि नियमानुसार मागविली जात नसल्याबद्दलही बैठकीत नाराजी व्यक्त करण्यात आली.

विठुरायाच्या वारकऱ्यांसाठी १०८ रुग्णवाहिकेची अहोरात्र आरोग्यसेवा; २७ रुग्णवाहिकांद्वारे २,४४५ वारकऱ्यांना आरोग्यसेवा

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- आषाढी वारीनिमित्त पंढरीच्या लाखो वारकऱ्यांना कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, यासाठी महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा (डायल १०८) अंतर्गत २७ रुग्णवाहिका २४ तास सेवेत तैनात करण्यात आल्या होत्या. या सेवेमार्फत एकूण २,४४५ वारकऱ्यांना वेळेत वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात आली. राज्यात महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा बीव्हीजीद्वारे संचालित केली जाते.

वारकऱ्यांना तात्काळ आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, यासाठी पंढरपूर येथे विशेष नियंत्रण कक्ष उभारण्यात आला होता. या नियंत्रण कक्षातून पालखी सोहळ्याचे सातत्याने निरीक्षण करून आवश्यकतेनुसार तात्काळ रुग्णवाहिका पाठविण्याचे नियोजन करण्यात आले. या नियंत्रण कक्षाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट देऊन सेवा व्यवस्थेची पाहणी केली.

याबाबत प्रतिक्रिया देताना बीव्हीजीचे चेअरमन हणमंतराव गायकवाड म्हणाले, ''पंढरीच्या वारीत भाविकांची सेवा करण्याची संधी मिळणे हे आमचे भाग्य आहे. आरोग्यमंत्री डॉ. प्रकाश अबिटकर यांच्या सूचनेनुसार आम्ही अल्पावधीत २७ रुग्णवाहिकांचे नियोजन केले. वारकऱ्यांना सुरक्षित व आरोग्यमय वारीचा अनुभव मिळावा, यासाठी बीव्हीजीचे आरोग्यदूत अहोरात्र सेवेत कार्यरत होते.''

मानाच्या दहा पालख्यांसाठी १०८ रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देण्यात आली. या पालख्यांमध्ये संत निवृत्तीनाथ महाराज (त्र्यंबकेश्वर), संत ज्ञानेश्वर महाराज (आळंदी), संत सोपानकाका महाराज (सासवड), संत मुक्ताबाई (मुक्ताईनगर), संत तुकाराम महाराज (देहू), संत नामदेव महाराज (पंढरपूर), संत एकनाथ महाराज (पैठण), रुक्मिणी माता (कौडानेपूर, अमरावती), संत निळोबाराय (पिंपळनेर, पारनेर) आणि संत चांगाटेश्वर महाराज (सासवड) यांचा समावेश होता.

आषाढी वारीदरम्यान गुड समरीटन स्वयंसेवकांनी ॲपचा प्रभावी वापर करून आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ माहिती १०८ नियंत्रण कक्षापर्यंत पोहोचवली. त्यामुळे रुग्णांना वेळेत वैद्यकीय मदत मिळण्यास मोठी मदत झाली. याबाबत स्वयंसेवक दयानंद मेंशेके म्हणाले, ''आषाढी वारीपूर्वी शासनामार्फत आयोजित प्रशिक्षणामुळे आपत्कालीन परिस्थितीत मदत करण्याचा आत्मविश्वास मिळाला. एक महिला भाविक बेशुद्ध पडताच मी तात्काळ गुड समरीटन ॲपद्वारे माहिती दिली. ॲप प्रभावीपणे कार्यरत असल्याने १०८ रुग्णवाहिका अल्पावधीत घटनास्थळी पोहोचली आणि संबंधित महिलेला वेळेत वैद्यकीय उपचार मिळू शकले.''

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
(आरोग्य विभाग)
जाहीर निवेदन

किटकजन्य आजार व जलजन्य आजार प्रतिबंधात्मक उपाययोजना

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शहरात डेंग्यू, चिकनगुन्या, झिका इ. किटकजन्य आजार व गॅस्ट्रो, कावीळ, कॉलरा, अतिसार यांसारख्या जलजन्य आजारांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी नागरिकांनी खालील प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवून महापालिकेस सहकार्य करावे. डेंग्यू, चिकनगुन्या व झिका हे विषाणूजन्य (व्हायरल) आजार आहेत. हे आजार विशिष्ट प्रकारचा म्हणजे 'एडिस इजिप्टाय' हा डास चावल्याने होतात. 'एडिस इजिप्टाय' हा डास साठवलेल्या स्वच्छ पाण्यात अंडी घालतो.

डेंग्यू, चिकनगुन्या व झिका यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना

- 'एडिस इजिप्टाय 'या डासांची उत्पत्तीस्थाने नष्ट करावी. जसे कुलर्समध्ये पाणी, मनीप्लँटमधील पाणी, छतावर पडलेली निकामी भांडी, बाटल्या, नारळाच्या करवंट्या, टायर्स, झाकण नसलेल्या टाक्या, हौद इ.
- दर आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा. हौद, टाक्यांना नेहमी झाकण लावावे.
- घरातील कुलर्समध्ये पाणी, फुलदाण्यातील, मनीप्लँटमधील पाणी आठवड्यातून कमीत कमी एकदा बदलावे.
- घरातील सांडपाण्यात अबेट (टेमीफॉस) हे डास-अळी प्रतिबंधात्मक औषध टाकून घ्यावे. घरात / परिसरात पाणी साचू देऊ नये. साचलेल्या पाण्यात रॉकेल / वाहनातील इंजिनचे जळालेले ऑईल टाकावे. हौदामध्ये गप्पीमासे सोडावे.
- डास प्रतिबंधात्मक मलम, उदबत्त्या, वड्या यांचा वापर करावा, अंगभर कपडे घालावे व मच्छरदाणीचा वापर करावा.
- महानगरपालिकातर्फे धूर फवारणी, औषध फवारणी, अबेट टाकणाऱ्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे.

जलजन्य आजार प्रतिबंधात्मक उपाययोजना

- नेहमी शुद्ध केलेले पाणी पिण्यासाठी वापरावे. (उकळलेले किंवा क्लोरिनयुक्त)
- अन्नपदार्थ नेहमी शिजवून व ताजे खावे, शिळे अन्न खाण्याचे टाळावे, अन्नपदार्थ नेहमी झाकलेले असावे.
- उघड्यावरील कापून ठेवलेली फळे, अन्नपदार्थ खाण्याचे टाळावे, जास्त पिकलेली कुजलेली, सडलेली फळे खाण्याचे टाळावे.
- अन्न शिजवण्यापूर्वी, जेवणापूर्वी तसेच शौचास जाऊन आल्यावर साबणाने हात स्वच्छ धुवावेत, उघड्यावर शौचास बसू नये.
- सर्वांनी वैयक्तिक स्वच्छता तसेच घर व परिसर स्वच्छता ठेवावी.
- डेंग्यू, चिकुनगुन्या, मलेरिया इ.किटकजन्य आजार व डायरिया, गॅस्ट्रो, कॉलरा, कावीळ, टायफाईड इ. जलजन्य साथीचे आजार हे नोटीफायबल आजार असल्यामुळे रुग्ण आढळल्यास खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांनी 24 तासांच्या आत मनपा आरोग्य विभागास कळविणे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायद्यानुसार बंधनकारक आहे.
- किटकजन्य / जलजन्य आजारांची लक्षणे आढळल्यास रुग्णांनी जवळच्या मनपाच्या आरोग्य केंद्र / रुग्णालय येथे संपर्क साधून उपचार घ्यावे.
- 24 तास साथरोग नियंत्रण कक्ष टोल फ्री क्र. 8956306007 वर कळवावे.
- e-mail: fwsipamcabd@yahoo.co.in

स्वाक्षरित/-

मा.श्री. समीर राजूरकर, महापौर, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर
मा.श्री. राजेंद्र जंजाळ, उपमहापौर, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर
मा.श्री. अनिल मकरीये, सभापती, स्थायी समिती, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर
मा.श्री. गोविंद केंद्रे, सभागृह नेता, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर
मा.श्री. अब्दुल समीर साजिद, विरोधी पक्षनेता, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर
मा. श्रीमती. डॉ. सुनीता सोळुंके, सभापती, वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर
मा.श्री. अमोल येडगे (भा.प्र.से.), आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर
मा. श्रीमती कल्पिता पिंपळे, अति. आयुक्त - 2, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर
डॉ. उज्वला भामरे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर
डॉ. सय्यद सुमैया नाझ, साथरोग तज्ञ तथा जीवशास्त्रवेत्ता (प्र.), महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर